१५ जून ६८। चाळीस पैसे

# माणूस



केवळ
भाकरीसाठी
फ्रान्स
पेटला
नाही.

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे अंक : तिसरा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक :
दिलीप माजगावकर,
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. मे, ३१

गेले वर्षभर दुथडी भरून वाहणाऱ्या प्रवाही 'व्होल्गास' वि. स. वाळिंब्यांनी पूर्णविराम दिला. या लेखमालेबद्दल वाळिंबे यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. प्रस्तुत लेखमालेचा उत्तरार्ध तर पूर्वार्धापेक्षा चांगलाच रंगला. तरीही एकूण सर्वच लेख [illegible], तत्कालीन राजकारण, परिस्थिती आणि स्थित्यंतरे यांच्या अनुषंगाने मांडलेले सिद्धांत व त्यांचे केलेले विश्लेषण हे अत्यंत अभ्यासपूर्ण आणि चिंतनीय होते. मागे 'माणूस'मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'नाझी' आणि 'डूगन'-च्या परंपरेत वाळिंब्यांची 'व्होल्गा' बसू शकेल.

रातराणी' हे विजय तेंडूलकर यांचे सदर दर्जेदार असते. एकूण सारे ठीक चालले आहे. मात्र 'ग्यानबा' यांची गैरहजेरी चांगलीच जाणवते. त्यांचे लेखन पूर्ववत सुरू होईल ही अपेक्षा!

—सुधीर सावत
मुंबई

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण,
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पॅ रि स
# आ णि
# पु णे

वेळ संध्याकाळची. एक शनिवार. दि. के. बेडेकरांच्या प्रशस्त गच्चीवर काही तरुण आणि मी 'अन्न स्वतंत्रते' विषयी चर्चा करण्यासाठी एकत्र जमलो होतो. या तरुणांची एक छोटीशी संघटना आहे. संघटनेचे नाव काय ते विचारायचे विसरलो. पण मार्क्स हे या तरुणांचे दैवत असावे असे स्पष्ट दिसत होते. तशी संख्या फार नव्हती. सुरुवातीला चार पाचजण होते. नंतर आणखी चार पाचजण आले. न आलेले, येऊ न शकलेले गृहीत धरून संघटनेची संख्या तीस चाळीसपेक्षा अधिक नसावी.

विद्यार्थी कामगारांनी पेटवलेली चळवळ आटोक्यात आणण्यासाठी द गॉलने सैन्याच्या काही तुकड्या, रणगाडे पॅरीस शहराच्या वेशीजवळ आणून उभे केले आहेत ही त्या दिवशीच्या वृत्तपत्रातील एक ठळक वार्ता होती.

आमच्याकडचा विद्यार्थी यामुळे किती प्रभावित झाला आहे, त्याच्या या उठावा-बद्दलच्या प्रतिक्रिया काय आहेत हे जाणून घेण्याची मलाही उत्सुकता होती.

'पॅरीसमध्ये सध्या काय घडत आहे असं तुम्हांला वाटतं ?' मी सुरुवात करतो.

'महागाई, बेकारी यांमुळे फ्रान्समधील कामगारवर्ग हैराण झाला आहे !' कोणीतरी उत्तर देतो.



यांना कुठे जायचे आहे !

'पण कामगारवर्गाने हा उठाव केलेला नाही. प्रथम विद्यार्थी खवळले-मागाहून कामगार संघटनांनी आणि त्यांच्या नेत्यांनी त्यांना साथ दिली. आणि विद्यार्थी फक्त फ्रान्समध्येच खवळलेला नाही. तो पूर्वयुरोपातही उठावण्या करतो आहे, प्रस्थापित व्यवस्थेला आव्हाने देतो आहे.' मी

'तरीपण महागाई, बेकारी, भांडवलशाही अर्थव्यवस्था हीच या असंतोषाची कारणे आहेत. पूर्वयुरोपातील व इतर कम्युनिस्ट राष्ट्रांतील विद्यार्थी असंतोषामागील भूमिका वेगळी आहे त्यांना अधिक स्वातंत्र्य हवे आहे, पण समाजव्यवस्था बदलावी अशी त्यांची मागणी नाही.' कुणीएक.

'फ्रान्समध्ये गेल्या दहा वर्षांत भरपूर सुबत्ता नांदत होती. महागाई होती, पण बेकारीचे प्रमाण काळजी करण्यासारखे नव्हते. अमेरिकेसारख्या घनाढ्य भांडवलशाही राष्ट्राला शह देऊन द गॉलने फ्रान्सची प्रतिष्ठाही खूप उंचावली होती. फ्रान्सने ज्यांचा नक्षा उतरवला त्यांनी या असंतोषाला खतपाणी घालून द गॉलवर आपला सूड उगवला, अशीही एक कारणमीमांसा आहे, ती कितपत बरोबर वाटते !' मी.

'सुबत्ता ही समाजवादाचा पर्याय ठरू शकत नाही. सुबत्ता असली तरी फ्रान्समध्ये विषमता होतीच.' विद्यार्थी.

'खवळलेल्या विद्यार्थ्यांना समाजवादच हवा होता अशी तुमची खात्री आहे का? कारण इंग्लंडमध्ये समाजवादी राजवट असूनही तिथला विद्यार्थी खवळतोच आहे. 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'वर कुणीतरी क्रांतीचा झेंडा फडकावला आहे; लंडनमधील फ्रेंच वकिलातीसमोर विद्यार्थ्यांनी निदर्शने केलेली आहेत.' मी

'इंग्लंडमध्ये समाजवाद आहे असं आम्ही मानत नाही.' विद्यार्थी.

'मग पॅरीसमधल्या बंडखोर विद्यार्थ्यांना हवा असलेला समाजवाद कुठला? समाजवाद म्हटला तरी त्याचा नमुना काही एकच नाही. हिंदुस्थानातही समाजवाद आहे असं म्हटलं जातं. पूर्व युरोपांत, रशियातही समाजवादाची निरनिराळी रूपे आहेत. यापैकी नेमकं कुठलं रूप पॅरीसमधल्या बंडखोरांना अभिप्रेत आहे?' मी.

'तसं काही सांगता येत नाही. पण बंडखोरांच्या हातात विळाकोयत्याचा लाल झेंडा होता यावरून त्यांना कम्युनिझमकडे जायचे आहे हे स्पष्ट होते.' विद्यार्थी.

'बंडखोरांच्या हाती लाल झेंड्यांबरोबरच अराजकवादाचे (Anarchy) काळे झेंडेही खूप होते हेही आपण लक्षात घेतले पाहिजे.' मी.

'विद्यार्थ्यांना डावीकडे जायचे आहे एवढे तरी स्पष्ट आहे. अराजकवादाची परंपरा फ्रान्समध्ये जुनी असल्याने काहींनी काळे झेंडे नाचवले असतील.' विद्यार्थी.

मार्क्सच्या बरोबरीने अलीकडे पॅरीस-बर्लिनमधल्या विद्यार्थीवर्गावर मार्क्युजच्या (Marcuse) विचारांचा पगडा आहे याचा उलगडा काय? आणि हा मार्क्युज तर यंत्रसंस्कृतीच्या मुळावरच आघात करतो. आजकालच्या यंत्रसंस्कृतीने माणसाला गुलाम केलेले आहे असे त्याचे मत आहे. डावीकडे जायचे आहे एवढे नक्की असले तरी कशाच्या डावीकडे हाही प्रश्न आहेच. मार्क्युजचे भक्त तर मार्क्सच्याही डावीकडे जाऊ इच्छितात असे दिसते.' मी

'हे खरे असले तरी पुढची पायरी म्हणून भांडवलशाहीच्या नाशावर आधारलेली पूर्वयुरोपाप्रमाणे एखादी कम्युनिस्ट राजवटच स्थापन व्हावी असे पॅरीसमधल्या बंडखोरांना वाटत आहे.' विद्यार्थी एकमताने सांगतात.

'बंडखोरांची प्रेरणा स्पष्ट आहे. पण प्रचलित अशी कुठलीच डावी व्यवस्था त्यांना मान्य नसण्याची शक्यता मला अधिक वाटते. त्यांना प्रचलित उजवे नकोत आणि डावेही नकोत असे दिसते. त्यांचा राग सर्वांवरच आहे. कुणावरच त्यांचा विश्वास दिसत नाही.' मी.

कुणीच या माझ्या विधानाला मनापासून होकार देत नाही. मार्क्स—लेनिन परंपरा क्रांतिकारक असली तरी कालबाह्य ठरू शकते हा विचारच त्यांना कदाचित या वयात मानवण्यासारखा नसावा.

चर्चा पुढे चालूच राहते. पण तत्पूर्वी...

बावीस मार्च. १९६८. नाँतेर या उपनगरातील पॅरिस विद्यापीठाशी संलग्न असलेल्या एका कॉलेजमधील काही विद्यार्थ्यांनी उत्तर व्हिएटनामला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी एक मोर्चा काढला. मोर्चात काही गैरप्रकार घडले, कॉलेज अधिकाऱ्यांचा विद्यार्थ्यांवर रोष झाला, काहींवर शिस्तभंगाचा इलाज केला गेला. यातून परिस्थिती चिघळत गेली व शिस्तभंगाला बळी पडलेल्या विद्यार्थ्यांना पाठिंबा व्यक्त करण्यासाठी आणखी काही मोर्चे निघाले, निदर्शनांना सुरुवात झाली प्रथम नाँतेर, नंतर लॅटीन क्वार्टर्स, पॅरिस आणि शेवटी फ्रान्सच्या इतर भागानही हे लोण हळूहळू पसरत गेले.

ही बावीस मार्चची चळवळ सुरुवातीला एका लहानशा अतिजहाल डाव्या क्रांतिकारक गटापुरतीच मर्यादित होती. मुख्यतः या गटात अराजकवादी, ट्रॉट्स्कीवादी, माओवादी विचारांच्या तरुणांचा भरणा होता. तेवीस वर्षांचा, याच कॉलेजचा 'समाजविज्ञान' शाखेचा कोहन बेंडिट हा विद्यार्थी या गटाचा नेता होता. याचा जन्म फ्रान्समध्ये, आई-वडील निर्वासित जर्मन ज्यू. बोलण्या-चालण्यात, वागण्यात-विचारात ज्वलज्जहाल व डोक्यावरचे केसही लाल यामुळे हा 'डॅनी दि रेड' या टोपण नावानेच विद्यार्थीवर्गात जास्त प्रसिद्ध होता. हर्बर्ट मार्क्युज (Marcuse) या अमेरिकन तत्त्वज्ञाचा हा आपल्याला शिष्य मानीत असल्याने मार्क्सवादी विद्यार्थिसंघटनांना व कम्युनिस्टांनाही तो कधीच जवळचा वाटला नाही. त्याच्या 'बावीस मार्च' चळवळीला तर या सर्वांनी प्रथमपासून विरोधच केला. उलट येथील कम्युनिस्ट विद्यार्थी संघटनेने एका प्रख्यात कम्युनिस्ट नेत्याला भाषणासाठी नाँतेरला पाचारण केले असता, या बावीस मार्चवाल्यांनी आरडाओरडा करून त्याचे भाषण बंद पाडले व आपण डाव्यांचेही डावे आहोत हे सिद्ध केले. नाँतेरचे महापौर कम्युनिस्ट पक्षाचे आहेत. त्यांच्या सल्ल्यावरूनच या बावीस मार्चवाल्या निदर्शकांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांनी हस्तक्षेप केला व परिस्थिती चिघळत गेली अशी वस्तुस्थिती आहे. कम्युनिस्ट विद्यार्थिसंघटनांचे प्रमुख व कम्युनिस्ट वृत्तपत्रे आपल्या अनुयायांना या बावीस मार्चवाल्यांपासून लांब राहण्याचे आदेश वारंवार देत होती हेही ध्यानात घेण्यासारखे आहे.

'ऑक्सिडेंट' नावाची उजव्या गटाची विद्यार्थी संघटनाही नाँतेरमध्ये अस्तित्वात होती व या ऑक्सिडेंटवाल्यांच्या आणि बावीस मार्चवाल्यांच्या मधूनमधून चकमकीही झडत असत. मे महिन्याच्या दोन तारखेला बावीस मार्चवाल्यांनी 'साम्राज्यवादविरोधी दिन' साजरा केला. परिस्थिती थोडीशी तंग झाली. कॉलेज अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन वातावरण शांत करण्याऐवजी सूडबुद्धीने कॉलेजच बंद करण्याचा निर्णय घेतला. परीक्षा जवळ आल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या वर्षाचा प्रश्न होता. अशा मोक्याच्या वेळी कॉलेज अधिकाऱ्यांनी आपली कोंडी करून आपल्याला शरण आणण्याचे ठरविले आहे अशी भावना विद्यार्थ्यांत बळावली

व ते खवळले. दुसऱ्या दिवशी, तीन मेला कॉलेज आवारातच अधिकाऱ्यांचा निषेध करण्यासाठी विद्यार्थ्यांची सभा झाली. सभा संपून विद्यार्थी शांतपणे परतत असतानाच आवारात पोलीस घुसले आणि त्यांनी बडवाबडवीला व धरपकडीला सुरुवात केली. आवारात पोलीस बोलावण्याचा निर्णय कॉलेज अधिकाऱ्यांनी शिक्षणमंत्र्यांच्या सल्ल्याने घेतला होता असे म्हणतात.

तशी फ्रान्सच्या शिक्षणसंस्थांमधून असंतोषाची दारू फार पूर्वीपासून ठासून भरलेली होती. नेपोलियनच्या काळापासून चालत आलेल्या या पद्धतीत आमूलाग्र सुधारणा हवी अशी मागणी सतत केली जात होती. इतर पाश्चिमात्य देशांच्या मानाने फ्रान्समधल्या फारच कमी विद्यार्थीसंख्येला पदवीपरीक्षेपर्यंत शिक्षण घेण्याची संधी लाभत होती. परीक्षा फार कडक घेतल्या जात. संख्येच्या मानाने प्राध्यापक कमी, जागा कमी, अभ्यासक्रम जुनापुराणा, सरकारची जाचक बंधने, नोकरशाहीचा वरचश्मा अशा अनेक तक्रारी होत्या. विद्यार्थ्यांचा विकास साधणारी ही ज्ञानमंदिरे नसून त्यांची मने मारणारे हे कत्तलखाने आहेत अशी टीका सर्रास होत होती. या दारूच्या कोठारावर ठिणगी पडण्याचाच काय तो अवकाश होता, ते पेट घेणार हे उघड होते. ही ठिणगी तीन मे या दिवशी पडली आणि धडाड्-धुमला सर्वत्र सुरुवात झाली. संघटना नाही, निश्चित योजना नाहीत, प्रस्थापित डाव्या–उजव्या कोणत्याच नेतृत्वाचा पाठिंबा नाही–तरी डॅनी दि रेडचा आगलावा पंथ आता चोहीकडे भराभर फैलावू लागला. चौकाचौकांत, गावोगाव डॅनी गर्जत होता, ‘ अखेरचा भांडवलशहा सुळावर चढला पाहिजे. त्यासोबत अखेरच्या नोकरशहाची आतडी लोंबकळली पाहिजेत. त्याशिवाय मानवजात सुखी होणार नाही. ’ ‘ मागे वळून पाहू नका, जुने जग कोसळत आहे. ’ ‘ रस्ते रोखून धरा. सोडू नका–’ आणि खरोखरच सहस्रावधी विद्यार्थी रस्ते रोखून धरीत होते, हटत नव्हते, पोलिसांशी दोन हात करू लागले होते, शिक्षणसंस्थांवर चालून जात होते, वाहनांची मोडतोड करीत होते, बॉम्ब्स फेकीत होते, आणि कायदा धाब्यावर बसवून लाखालाखांच्या मिरवणुका–मोर्चे काढीत होते.

पॅरीसमध्ये व्हिएटनामच्या वाटाघाटींची तयारी पूर्ण झाली होती. अमेरिकन व व्हिएटकाँग शिष्टमंडळांना विद्यार्थी–उठावाचा उपसर्ग पोचू नये म्हणून वाटाघाटींच्या स्थानाकडे जाणाऱ्या सर्व वाटा पोलिसांनी रोखून धरल्या होत्या. तरी एक विद्यार्थी-मोर्चा तिकडे निघालाच. सीन नदीच्या एका पुलावर पोलिसांनी तो अडवला. विद्यार्थी पांगण्याऐवजी तटबंद्या रचून त्यांच्याआड दडले व त्यांनी ‘ खुनी द गॉलचे हस्तक ’ म्हणून पोलिसांवरच हल्ला चढवायला सुरुवात केली. फूटपाथवरचे दगड उपसून, झाडे तोडून, वाहने अडवून विद्यार्थ्यांनी या तटबंद्या रस्त्यात उभ्या केल्या व त्याआडून पोलिसांशी आपले प्रतिकारयुद्ध जारी ठेवले. लॅटिन क्वार्टर्स विभागात



**सारेच नवे, सारेच उन्मादक**

रात्ररात्र या चकमकी चालू राहिल्या. ऐनवेळी या तटबंद्या रचण्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना कोणी दिले ? तोडमोडीला लागणारे साहित्य कुठून जमा झाले ? विद्यार्थ्यांची मानसिक तयारी केंव्हा झाली ? रुमाल आडवे धरून विद्यार्थी अश्रु-धुरापासून स्वतःचा बचाव करून घेत, काहींनी शिरस्त्राणे, ढाली यांचाही वापर केला, हे सारे त्यांना कोणी पुरवले ? जखमी विद्यार्थ्यांना नागरीकच आपल्या घरात घेऊन उपचार करीत होते, पोलिसांचे लक्ष जाऊ नये म्हणून कोवळीकोवळी मुले आडोशाला लपून आपल्या जखमांवर आपणच गुपचूप इलाज करीत होती.

पाच-सातशे विद्यार्थी जेव्हा जखमी होऊन इस्पितळात पडले, घराघरांत शिरून जेव्हा पोलिसांनी अत्याचार केले, रेडक्रॉससारख्या संघटनेला जेव्हा विद्यार्थ्यांच्या शुश्रूषेला व मदतीला जाण्यास सरकारतर्फे बंदी करण्यात आली तेव्हा संतापाची तीव्र लाट साऱ्या देशभर उसळली आणि शिक्षणसंस्था धडाधड बंद पडू लागल्या. काहींवर तर विद्यार्थ्यांनी आपला अंमलच सुरू केला. देशातील तेवीस विद्यापीठांवर विद्यार्थ्यांचा ताबा होता, इतर अनेक विद्यापीठांनी सर्व सरकारी बंधने झुगारून आपली स्वायत्तता उद्घोषित केली होती. शिक्षक-प्राध्यापक वर्ग आता उघडउघड विद्यार्थ्यां-बरोबर मिरवणूक-मोर्च्यात, निदर्शनात सहभागी होऊ लागला होता. विद्यार्थ्यांच्या

ताब्यात आलेल्या विद्यापीठातून, कॉलेजातून नव्या शिक्षणक्रमांविषयी, नव्या समाजव्यवस्थेसंबधी घनघोर चर्चा झडू लागल्या. विद्यार्थी–कामगार यांचे संबंध, विद्यापीठांचे समाजातील स्थान, संस्कृती आणि मांडवलशाही अशा गंभीर विषयांवरही ही खवळलेली मुले रात्ररात्र जागून विचारविनियम करीत होती. जिन पॉल सार्त्रसारखे लेखक, मोनोडसारखे नोबेल पारितोषिक विजेते कधी स्वत: उपस्थित राहून, कधी पत्रके प्रसिद्ध करून या विद्यार्थ्यांना ' आगे बढो ' म्हणून सांगत. सोरबोन विद्यापीठाच्या सभागृहात उसळणाऱ्या विद्यार्थी–श्रोत्यांच्या समेत भाषण करताना सार्त्र ' डॅनी दि रेड ' ला उद्देशून म्हणाले होते–' तुझ्यातून असे काही बाहेर फेकले गेले आहे की ते झपाटून टाकणारे आहे. आश्चर्य करायला लावणारे आहे. जे जे म्हणून आज या समाजव्यवस्थेत मान्यता पावलेले आहे ते ते तुझ्यातील ' त्या 'मुळे झुगारले जात आहे. शक्यतेच्या मर्यादा तुझ्यामुळे विस्तारत आहेत. हे अर्धवट सोडू नकोस '...

संघटित पक्षांचे आणि त्यांच्या नेत्यांचे डोळे आता हळूहळू उघडत होते. पोलिसांच्या अत्याचारामुळे सर्वसामान्य फ्रेंच नागरिक विद्यार्थ्यांना सहानुभूती दाखविण्यासाठी आसुसला होता. आता जागलो नाही तर ' क्रांती 'ची आपली बस चुकेल, आपल्याला बाजूस फेकून ही लोकगंगा कदाचित् पुढे उसळत निघून जाईल या भयाने आता सगळेच पक्ष, सगळ्या संघटना— डाव्या, अतिडाव्या, अधल्यामधल्या— अहमहमिकेने पुढे सरसावल्या १३ मेला पॅरीस शहरातून पाच लाखांचा प्रचंड मोर्चा निघाला त्यात हे सगळे पक्ष, सर्व संघटना सामील झाल्या होत्या. यात मेंडेस फ्रान्स होते, मिटेरॅंड होते, वॉल्डेक रोचेट होते, काही गॉलवादीही होते. पण गाजत गर्जत होते, डरकाळ्या फोडीत चालले होते विशीपंचविशितले नवे चित्ते, नवे छावे. चाळीस चाळीसच्या रांगात, हातात काळे, लाल, दुरंगी, तिरंगी सर्व प्रकारचे झेंडे नाचवीत, International हे प्रसिद्ध क्रांतिगीत गातगात, मुठी फेकीत, ' गॉल चालते व्हा , म्युझियममध्ये बसा ' अशा घोषणा देत ही अक्राळविक्राळ लोकगंगा जेव्हा पॅरीसच्या राजपथावरून फेसाळत फुसाटत धावू लागली तेव्हा दोनशे वर्षांपूर्वीच्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या दिवसांची जाणत्यांना आठवण झाल्याशिवाय राहिली नाही. कुठल्याच जुन्या साच्यात ही क्रांती, हा उठाव बसू शकत नव्हता, कुठल्याच क्रांतिशास्त्राचा याला आधार सापडत नव्हता. सारेच नवे, सारेच उन्मादक. ' Youngest, most dynamic '–' अत्यंत जोषपूर्ण, अत्यंत वेगवान ' अशी या मोर्च्याची वृत्तपत्रांतून वर्णने झळकली. दुसऱ्या महायुद्धानंतर प्रथमच पॅरीस शहराला असा चैतन्याचा स्पर्श होत होता. पाच लाखांचा मोर्चा, पाच तास सतत वाहत होता, एकही पोलिस बंदोबस्तासाठी ठेवला गेला नव्हता, तरीही अनुचित प्रकार घडला नाही याची सर्व निरीक्षकांनी आवर्जून नोंद केली आहे.

तीन मेला सुरू झालेल्या आंदोलनाचे पहिले विद्यार्थिपर्व कामगारांनी व सर्वसामान्य जनतेने असे पुढे झेलत नेले–आणि हे असेच पुढे पुढे गेले– तर आवरता आवरणे कठीण होईल, म्हणून राज्यकर्त्यांनी नमते घेण्याचे ठरविले. आपले परदेश दौरे अर्धवट सोडून पंतप्रधान पाँपेदू, अध्यक्ष द गॉल पॅरीसमध्ये वाटाघाटींसाठी दाखल झाले. 'डॅनी दि रेड' जर्मनीमध्ये हद्दपार केला गेला होता, तो जंगलातून वाट काढीत, आपले लाल केस काळेभोर करून, पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फ्रान्समध्ये उगवला, तरी त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला, बंद करण्यात आलेली कॉलेजे, विद्यापीठे पुन्हा सुरू करण्याची तयारी दाखवण्यात आली, अटक झालेल्या विद्यार्थ्यांची बिनशर्त सुटका झाली, 'वाटाघाटींसाठी या' असे कामगारसंघटनांना आवाहन केले गेले तरी वणवा भडकायचा तो भडकलाच. विद्यापीठे बंद पडली, तसे आता कारखाने बंद पडू लागले. पहिली काडी ओढली नाँतिस (Nantes) येथील दोन हजार कामगारांनी. पोलिसांनी आत प्रवेश करू नये म्हणून त्यांनी कारखान्याची प्रवेशद्वारे वेल्डिंग करून पक्की बंद करून टाकली. व्यवस्थापकाला ओलीस म्हणून कोंडून ठेवले. कामगारांची मागणी अर्थात पगारवाढीची. पाठोपाठ सरकारी मालकीचा रेनॉल्ट हा मोटार कारखानासमूह थंडावला– कामगारसंख्या दहा हजार· As Renault goes, workingclass go–' 'जेथे रेनॉल्ट तेथे कामगार' अशी या कारखानासमूहाची ख्याती आहे. भराभर हे लोण इतरत्र पसरले. कुठे कुठे कामगारांनी कारखानेच ताब्यात घेतले. रेल्वे, बसवाहतूक थंडावली. विमानांची घरघर थांबली, बंदरांवरची धावपळ संपली. शस्त्रास्त्रनिर्मितीचे कारखानेही संपात सामील झाले. एकूण दोन कोटी कामगारसंख्येपैकी जवळजवळ निम्मी संख्या संपावर होती. बँकांचे व्यवहार आखडले, परदेशी बँकांवर ताण पडला. अपंगांवर, वृद्धांवर उपासमारीची पाळी आली. पेट्रोलचा तुटवडा जाणवू लागला. रस्तोरस्ती कचऱ्याचे ढीग मजल्याएवढे उंच चढले. शेतकरीही मागे राहिला नाही– रस्त्यात ट्रॅक्टर्स उभे करून त्याने ठिकठिकाणी वाहतुकीस अडथळे निर्माण करून ठेवले. शिक्षणसंघटनांनी पाठिंबा व्यक्त केला–शाळा बंद पडल्या. पॅरीसच्या 'नाईट क्लब्स'चे रंगही विरघळले–आम्ही अंगप्रत्यंगप्रदर्शन करणार नाही, असे त्या नर्तिकांनी जाहीर केले. कलावंत, लेखक, चित्रकार सारेच या वावटळीत ओढले गेले–नाट्यचित्रपटगृहे ओस पडली. सरकारी मालकीचे बाराशे आसनांचे 'ओडियन' थिएटर तर विद्यार्थ्यांच्या ताब्यातच होते व तेथे विद्यार्थीचर्चांचा आणि वादसभांचा आखाडा चोवीस तास घुमत होता. विषय : 'समृद्धीची मूल' किंवा असेच दुसरे कोणतेतरी.

कामगार-किसान-शिक्षक-कलावंतांच्या असहकारामुळे साऱ्या फ्रान्सच्या नाड्या

[पान ६० वर]

# आस्वाद

“ बहु देवीं देव एकचि हा पाहा ।
पाहा नचि तेथें निरसोनी राहा ।
राहा पाहा म्हणणे शब्द लेश हा ।
लेश जातां आपेआपणातें पाहा ।। १ ।।
जयदेव जयदेव देवाधिदेवा ।
आरती ओवाळू भावड्या भावा ।। ध्रु० ।।
भावाभाव जेथे निरसोनी गेला ।
गेला म्हणतां तेथें शब्दची ठेला ।
ठेला गेला हा शब्द जेथे निमाला ।
तेथे रामदास रामची झाला ।। २ ।। ”

या छोट्या आरतीमध्ये रामदासांनी फार मोठा साक्षात्कार व्यक्तविला आहे. देवाचे ध्यानार्चन करता करता त्याच्या स्वरूपाशी एकरूप झालेल्या भावड्या भक्ताचे भावचित्र या आरतीत आलेले आहे.

देवाच्या मूर्ती अनेक आहेत. अवतार भिन्नभिन्न आहेत. दृश्याकार वेगवेगळे आहेत. पण या सर्व ठिकाणी असणारे देवत्व एकच आहे. एकाच परमेश्वराची ही सगळी रूपे आहेत. एकाच तेजाच्या या निरनिराळ्या ज्योती आहेत. म्हणून या अनेक देवांमध्ये एकच देव पाहा असे रामदास म्हणतात. अर्थात हे पाहणे म्हणजे नुसते ‘ पाहणे ’ नाही. केवळ बुद्धीने जाणणे नाही. तेथे ‘ निरसोनी राहणे ’ रामदासांना हवे आहे. सर्व भावनांचा लय त्या ‘ एका ’च्या ठिकाणी विलय पावला पाहिजे. तरच त्या अनेकत्वी एकत्व पाहण्याला काही अर्थ निर्माण होईल. खरे म्हणजे ‘ पाहा ’ अथवा ‘ निरसोनी राहा ’ हे केवळ वेगळे शब्द आहेत. त्यांच्यामागील भावना, त्यांचे अर्थाकार एकच आहेत. अनेक देवांमध्ये एकच परमतत्त्व आहे हे ज्याने मनोमन जाणलेले आहे, त्याच्या सर्व वृत्ती त्या परमतत्त्वाच्या ठायी

तत्क्षणी तदाकार होऊन जातात. फार काय, आपणा स्वतःलाही तो वेगळा ओळखत नाही. तोही त्या एका परतत्त्वाशी एकरूप होऊन जातो. " राहा पाहा म्हणणे शब्द लेश हा । लेश आपेआपणाते पाहा " या रामदासांच्या म्हणण्याचा अर्थ हा आहे. शब्दांची कवचे गळून पडली आणि अर्थाच्या भावगाभ्यात मनाने प्रवेश केला म्हणजे देवमूर्तीचे अनेकत्व, त्यांमध्ये अनुस्यूत असणारे एकच परमतत्त्व आणि या परमतत्त्वाची जाणीव झालेला भक्त अशी दृश्यदर्शनद्रष्टा यांची त्रिपुटी एकच आकृतिबंध तयार करते. या आकृतिबंधाची बाह्यरेषा वेगवेगळ्या वळणांची असते; पण त्याच्या परस्परसंयोगांची रेषा मात्र दिसूही शकत नाही, इतकी स्वरूपी मिळून गेलेली असते. अशी या देवाधिदेवाची, परमतत्त्वाची आरती रामदास भाबड्या भावाने करीत आहेत.

सर्व भावना, भाव आणि अभाव, होय आणि नाही, अस्तित्व आणि नास्तित्व सर्वांचा त्या परमतत्त्वाच्या ठिकाणी लोप झालेला आहे. त्यांना तेथे विश्रांतिस्थान लाभलेले आहे. आणि त्यामुळे तेथे शब्दही थबकलेला आहे. जे आहे ते शब्दाच्या पलीकडचे आहे. वाणीला ते गवसणारे नाही. केवळ दूर राहून स्तिमितपणे पाहणे हीच येथे शब्दाची, वाणीची इतिकर्तव्यता आहे. म्हणून तेथे ' शब्दची ठेला ' आहे. ठेला, गेला या शब्दांचेही तेथे काही काम नाही. कारण, वर सांगितल्याप्रमाणे या ठिकाणी एकतत्त्वाच्या जाणिवेने साधक ईश्वररूप झालेला आहे. रामदास ' रामची ' झालेला आहे. देवाच्या सर्वव्यापकत्वाचा साक्षात्कार अनुभवल्यानंतर उचंबळून आलेले समर्थ रामदासांचे हे अनुभवाचे बोल आहेत. आपल्या या तन्मयावस्थेच्या अनुभूतीचीच त्यांनी इथे आरती गाइली आहे.

एवढा मोठा भावाशय इतक्या थोड्या अवकाशात आणि सोप्या भाषेत क्वचितच कोणी व्यक्त केला असेल. आरत्या अनेक देवांच्या गायिल्या जातात. स्वतः रामदासांनीही निरनिराळ्या देवदेवतांच्या आरत्या लिहिल्या आहेत. देवमहात्म्यवर्णनाच्या दृष्टीने त्या चांगल्याही आहेत. पण येथे एका महान अनुभूतीचे जे स्वच्छ प्रतिबिंब पडलेले आहे ते अपूर्व आहे. रामदासांच्या समर्थ व्यक्तिमत्त्वाचा तो एक कवडसा आहे. अनेक देव ही एकाच देवाची निरनिराळी रूपे आहेत, या साध्या सरळ सिद्धांतापासून प्रारंभ करून ४–२ ओळींतच रामदासांनी आपल्या रामस्वरूप साक्षात्कारस्थितीचा प्रत्यय आणून दिला आहे. ही झेप केवळ बुद्धीला दिपविणारी नसून अंतःकरणाला वेधणारी आहे.

' गेला–ठेला, ' ' पाहा–राहा ' या शब्दद्वंद्वांच्या आवर्तनाने या आरतीला ताल तर प्राप्त झाला आहेच, पण त्यातील अनुभूतीत जो सर्वभावाचा विलय अभिप्रेत आहे त्याच्या एकसंघ रंगपरिमाणालाही त्याने कितीतरी परिणामाचे सामर्थ्य आलेले आहे. ही समर्थ रामदासांची एक प्रसादपूर्ण आरती ठरली आहे.

–रसिक

# एक चक्षुर्वैसत्यं वृत्तान्त

# आसाम आसाम आसाम

एक काळ असा होता की सर्व आसाम गांधी आणि नेहरूंची पूजा करीत होता. त्यांना आपले नेते समजून दिल्लीकडे मोठ्या आशेने पाहात होता. फाळणीचा धोका पत्करला होता पण तरीदेखील सत्तेचाळीस साली, आता सोन्याची संधी आल्याचं आसामच्या भाबड्या मनाला वाटत होतं. इतर प्रांतांतील लोकांच्या बरोबर, तितक्याच हिरिरीने स्वातंत्र्य-चळवळीत भाग घेतलेल्या लोकांना सार्थक झाल्यासारखे वाटत होते. आपले नाही तरी नवीन पिढीचे कल्याण होईल असं वाटत होतं. गांधीजी गेले तसा आसाम नेहरूंच्याकडे अधिक आशेने पाहायला लागला. मग जसजशी वर्षे एकामागून एक जात राहिली तसतशी भरभराटीची, स्थैर्याची, विपुल संधीची आशा हळूहळू विरत चालली असं लक्षात आलं. सरळ, शांत पण काहीशा दुर्बल अशा आसामीयांना सर्वच क्षेत्रात पुढं यावं असं वाटत होतं पण जमत नव्हतं. एक गोष्ट मात्र जमली आणि ती म्हणजे शिक्षणप्रसार. जिद्दीनं, चिकाटीनं शिक्षणाचा प्रसार करण्यात आला. खेड्या खेड्यांतून मुला-मुलींच्या शाळा आणि कॉलेजे निघाली. आज महाराष्ट्रापेक्षा-देखील आसामात साक्षरतेचं प्रमाण अधिक आहे हे

# ?

## हरी मिरासदार

सांगितलं तर अनेकांना आश्चर्य वाटेल, पण ते खरं आहे. ही नवी पिढी जेव्हा शिक्षित होऊ लागली तेव्हा त्यांना आसामच्या आर्थिक मागासलेपणाची तीव्रतेने जाणीव व्हायला लागली. केंद्र सरकार आपल्याकडे लक्ष देत नाही अशी काहीशी साधार तक्रार केली जाऊ लागली. मग आले १९६२ साल आणि त्याच्याबरोबर लाल चीनचा हल्ला. नेफातील महत्त्वाची ठाणी पडली, तेथील लोक दिब्रुगड जोरहाट या शहरांतून आश्रयासाठी आले. सगळीकडे कसं तंग वातावरण होतं आणि लगेच बातमी पसरली, चिनी सैन्य तेजपुरात शिरणार. पाठोपाठ पंडितजींचे भाषण—" My heart goes with the people of Assam. " झाले. सगळेच संपले असं वाटलं लोकांना. बाकीचा हिंदुस्थान वाचविण्यासाठी आसामचे चीनला दान केले जाणार ही बातमी म्हणा किंवा अफवा म्हणा साऱ्या आसामभर पसरायला वेळ लागला नाही. दिल्लीतील काही बडे काँग्रेसी नेते याच काळात गोहाटीला येऊन गेले. त्यांनी ' आम्ही आसामचा निरोप घ्यायला आलो आहोत ' असं सांगितल्याचं गोहाटीचे काही लोक आज सांगतात. हे बोलणं खरं की खोटं माहीत नाही, पण एकूण या सगळ्या प्रकाराने केंद्राबद्दलच्या असुरक्षिततेच्या, अविश्वासाच्या भावनेनं मूळ धरलं हे मात्र निश्चित. ज्या गांधी-नेहरूंच्याकडे लोक मोठ्या आशेने पाहात होते त्या गांधींना लोक आता विसरून गेले आहेत, नेहरूंच्या नावाने बोटं मोडताहेत आणि परवा तर चक्क इंदिराबाईंचे पुतळे करून लोकांनी जाळले.

### चालिहा विरुद्ध दिल्ली

आसामच्या जनतेच्या मनाची ही स्थिती ओळखून दिल्लीतल्या नेत्यांनी काही करावे तेही केलं नाही. केली फक्त सैन्याची भरती आणि स्वतःला अनुकूल असलेल्या

कॉंग्रेसमधील गटाची काळजी. आसाममध्ये कॉंग्रेस अधिकारावर आहे याचं कारण दुसरा कोठलाही पक्ष प्रबळ नाही म्हणून. कॉंग्रेसमध्ये आपसात गटबाजी आणि मारामाऱ्या आहेत एवढेच नाही तर मुख्य मंत्री श्री. विमला प्रसाद चालिहांच्या विरुद्ध माजी शिक्षणमंत्री श्री. देवकांत बरुआ दंड थोपटून सध्या उभे आहेत. श्री. देवकांत बरुआ यांचे पंडितजी असल्यापासून नेहरू घराण्याशी जवळचे संबंध आहेत. हे महाशय इंग्लिश सुरेख बोलतात आणि मुसलमानांविषयी त्यांना विशेष प्रेम आहे आणि त्यामुळेच पंडितजींना हे फारच प्रिय होते असं म्हणतात. त्याशिवाय सध्या इंदिराबाईंच्या मर्जीतील श्री. फकरुद्दीन अहंमद आणि श्री. बरुआ एकाच गटातील आहेत. श्री. चालिहांनी त्यांना मुख्यमंत्री होऊ दिले नाही. त्यामुळे श्रीमती गांधींचा त्यांच्यावर (चालिहांवर) गुस्सा आहे म्हणे ! परवा डिसेंबरमध्ये नेफाचा दौरा झाल्यानंतर चालिहा श्रीमती गांधींना भेटलेच नाहीत. त्याला अर्थात मतभेदांची खूप मोठी पार्श्वभूमी आहे. श्री. चालिहांना नागालँड वेगळे होणे नको होते. ते श्री. नेहरूंनी दिले. नेफा आसामबरोबरच असावा असं त्यांचं म्हणणं. पण केंद्राने नेफा वेगळा केला, तेथील शिक्षणाचे माध्यमही असमिया ठेवले नाही. आणि आता खासी जैंतिया–गारो यांच्यासाठी वेगळे पहाडी राज्य किंवा तशाच स्वरूपाचे फेडरेशन याला श्रीमती गांधींचा आशीर्वाद आहे. १९६२ च्या निवडणुकीच्या काही दिवस आधी शिलाँगमध्ये ख्रिश्चनांचे प्रभुत्व असलेल्या पहाडी नेता सम्मेलनाने ' डायरेक्ट अॅक्शन 'ची धमकी दिल्याबरोबर इंदिराबाई तडक शिलाँगला आल्या. ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सच्या सभेत भाषण करून व खाजगी बोलण्यात, त्या स्वतंत्र पहाडी राज्याची मागणी मान्य करण्याचे आश्वासन देऊन गेल्या. श्री. चालिहांचा याला अर्थातच विरोध आहे. त्याला शह म्हणून त्यांनी Assam for Assamese आसाम आसामींकरिता – या चळवळीला पाठिंबा दिला. ढोबळ मानाने परस्पर विरोधाचीही ही कारणे असली तरी यांच्याबरोबरच इतर गुंतागुंत आहेच.

फकरुद्दिन अहंमद आसाममध्ये होते तोपर्यंत त्यांचा जबरदस्त प्रभाव आसामच्या मंत्रिमंडळावर होता. ते दिल्लीला गेल्यावर त्यांनी आता तेथून सूत्रे हलवायला सुरुवात केली आहे. तसं एकूण दिल्लीचे धोरणच श्री. चालिहांच्या विरुद्ध आहे हे आता स्पष्ट झाले आहे. ख्रिश्चन मिशनरी आणि पाकिस्तानी यांच्या संख्याबलांनी आणि राजकीय हालचालींनी आपणच गिळले जाऊ अशी धास्ती जेव्हा श्री. चालिहांना वाटू लागली तेव्हा हे काटे दूर करावे यासाठी त्यांनी पावले टाकायला सुरुवात केली. नागालँड, मिझो, खांसी-गारो वगैरे लोक ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या वर्चस्वाखाली गेले आहेतच. आता निदान आसामचे बाकीचे जिल्हे आणि नेफा हे तरी त्यांच्यापासून वाचवावे या सद्हेतूने श्री. चालिहांनी दरंग, उत्तर लखीमपूर येथील परदेशी मिशनऱ्यांना भारत सोडून जाण्याच्या नोटिसा दिल्या, ख्रिश्चन लॉबीच्या दबावामुळे केंद्रीय शासनाने या नोटिसा मागे घ्यायला लावल्या. पाकिस्तानी

मुसलमानांविषयी काहीतरी करावे असे अगदी अलीकडे मुख्य मंत्र्यांना वाटू लागले होते. तेवढ्यांत फकरुद्दिन अहमदांनी सूत्रे हालवून पाकिस्तानी मुसलमान घुसखोरांना भारतीय नागरिकत्व बहाल करण्याचा फतवा दिल्लीहून काढायला लावला. श्री. चालिहांना विरोध करायला, तोंड उघडायलासुद्धा संधी मिळाली नाही. काँग्रेस नेत्यांमधील या आपसातील लाथाळीतून देशाला बरबाद करण्याची स्पर्धाच जणू काही चालली आहे असं हे चित्र आहे. स्थानिक लोक श्री. चालिहांना बरे म्हणतात आणि केंद्राला नावे ठेवतात. खरी गोष्ट अशी आहे की, आपल्या खुर्चीला जोपर्यंत काही धोका नाही तोपर्यंत काही हालचाल करायची नाही हेच काँग्रेसी नेतृत्वाचे सूत्र आहे !

## जवान आणि जनता

केंद्र आणि राज्य यांच्यांतील संबंध ढासळलेले आहेत हे जसं वर आपण पाहिलं, त्यापेक्षा एक वेगळा आणि अधिक क्लेशदायक प्रकार अलीकडे आसाममध्ये दिसू लागला आहे. १९६२ च्या चिनी आक्रमणानंतर सरकारला थोडी जाग आली आणि मिलिटरी व रिझर्व्ह पोलिस यांची ठाणी आसाममध्ये जिकडे तिकडे दिसू लागली. या जवानांच्याविषयी स्थानिक जनतेत जी श्रद्धा असावयास हवी तीच नाहीशी होऊ लागली आहे की काय अशी भीती वाटू लागली आहे. मोठ्या संख्येने आलेल्या या जवानांच्यामुळे महागाई वाढते, त्यांच्या खोड्यांमुळे सामाजिक वातावरण बिघडते वगैरे तक्रारी इतके दिवस कोणी करीत नव्हते. परंतु केंद्राविषयी जसजसा अविश्वास वाढू लागला, अन्यप्रांतीय लोकांच्या हातात येथला व्यापार उद्योग असल्यामुळे आपली आर्थिक कोंडी होत आहे असं जेव्हा तीव्रतेने वाटायला लागले, तेव्हा लष्करी जवानांबद्दलही एक प्रकारची अश्रद्धा निर्माण होऊ पाहात आहे. अलीकडे दंगेधोपे झाल्यानंतर शहरे मिलिटरीच्या ताब्यात देण्याचे प्रसंग वाढले तसा हा दूरत्वाचा भावही वाढू लागला. या दृष्टीने परवा गोहाटीला घडलेल्या एका लहान प्रसंगाने किती विकृत रूप घेतले पाहा. कॉटन कॉलेजच्या वसतिगृहाजवळील चौकात एक लष्करी ट्रक आणि दोन विद्यार्थी चालवीत असलेली मोटारसायकल यांची निसटती धडक झाली. आजूबाजूचे लोक आणि हॉस्टेलचे विद्यार्थी लगेच जमलेच. त्यातून विद्यार्थी आणि जवानांची बाचाबाची सुरू झाली. तेवढ्यात काही विद्यार्थ्यांनी ट्रकवर दगडफेक केली. त्याची उलटफेड म्हणून जवानांनी नंतर काही विद्यार्थ्यांना चोपले. मुद्दाम आपल्याविरुद्ध बातमी दिली म्हणून जवानांनी पी. टी. आय. च्या कचेरीत घुसून तेथील कर्मचाऱ्यांनाही नंतर बडविले. परिणाम म्हणून विद्यार्थ्यांनी एक मिरवणूक काढून कॉलेजच्या आवारात असलेला मिलिटरीचा एक कॅम्प हलवावा अशी मागणी केली. ही घटना अगदीच स्थानिक स्वरूपाची असली तरी सैनिक आणि नागरिक यांचे संबंध असावे तसे चांगले राहिले नाहीत, हे उघड आहे. सीमेवरील प्रांतात नागरी आणि लष्करी संबंधांत

वितुष्ट येणं याचे परिणाम काय असतात हे सांगणे नको. भावनात्मक ऐक्याचा दुवा ढासळायला लागला आहे याचे हे लक्षण आहे, म्हणूनच या लहानशा घटनेचा गंभीरपणे विचार व्हायला हवा.

## असमिया आणि बिगर असमिया

या सर्व प्रकारांना शेवटी असमिया विरुद्ध बिगर असमिया हेच अधिष्ठान आहे. याचेच निरनिराळे पैलू सर्वच क्षेत्रांत ही घोषणा शिरल्यामुळ दिसू लागले आहेत. त्यातीलच एक म्हणजे अन्यभाषी वरिष्ठ अधिकारी आणि स्थानीय नोकरवर्ग यांच्यांतील संबंध दिवसेंदिवस कटू होत चालले आहेत. काही हितसंबंधी हे संबंध अधिक कटू व्हावेत म्हणून अर्थात मुद्दाम त्यांत खतपाणी घालीत आहेत. आसाममध्ये अन्य प्रांतांप्रमाणेच केंद्रीय खात्यामध्ये अन्यभाषी वरिष्ठवर्ग आहेच. शिवाय येथील चहाचे मळे, तेल कंपन्या वगैरे उद्योगांमधून देखील बिगर असमिया वरिष्ठवर्गाचे प्रमाण खूप मोठे आहे. साहजिकच 'शिवसेनेची' भावना—जरी तशा प्रकारचे संघटित प्रयत्न नसले तरी—खूपच जोराने फोफावते आहे. काही वेळा हे अधिकारी स्थानिक लोकांच्या भावना लक्षात न घेताच वागतात. शिवसागरच्या ऑइल अॅन्ड नॅचरल गॅस कमिशनच्या एका बिगर असमिया वरिष्ठ अधिकाऱ्याला स्थानिक लोकांसंबंधी अनुदार उद्‌गार काढले म्हणून मररस्त्यात एकदा बडविले. तेव्हापासून तेथील वातावरणातील तेढ कायमच आहे.

सरकारी शासनातही हा असमिया—नॉन असमिया प्रकार शिरल्याचे परिणाम किती भयानक होतात याचे १९६८ च्या प्रजासत्ताकदिनाचे उदाहरण आपल्यासमोर आहेच. कदाचित बऱ्याच लोकांना माहीत नसेल म्हणून सांगतो. २६ जानेवारी १९६८ रोजी सकाळी गोहाटी शहरात राष्ट्रध्वजाचा अपमान, जाळपोळ, लुटालूट वगैरे सुरू झाल्यानंतर जिल्हाधिकारी श्री. सहगल (अर्थात बिगर असमिया) यांनी भराभर हुकूम देण्यास सुरुवात केली. काही वेळाने ते स्वतः बाहेर पडले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, आपले हुकूम कोणीच पाळले नाहीत. आपल्या आज्ञा जाणूनबुजून ऐकल्या जात नाहीत हे पाहताच परिस्थिती आटोक्याबाहेर गेली आहे हे त्यांच्या लक्षांत आले. त्यांनी लगेच लष्करी अधिकाऱ्यांशी संबंध स्थापित करून लष्कर पाठविण्याची विनंती केली. दुपारी एक वाजता कर्फ्यु लागू केल्याची घोषणा रेडिओवरून झाली, पण त्याची अंमलबजावणी करायला मात्र कोणीच नाही अशी स्थिती होती. सायंकाळी चार वाजता लष्कराने शहर ताब्यात घेईपर्यंत गुंडांनी मनसोक्त लुटालूट व जाळपोळ करून घेतली होती. या दंग्यामागे फार मोठी योजना होती हे खरं असलं तरी अधिकाऱ्यांची आज्ञा न ऐकण्यामागे असमिया-बिगर असमिया ही भावना होती यात संशय नाही. काही वरिष्ठांच्या बडतर्फी आणि काहींच्या बदल्या या प्रकरणानंतर केल्या गेल्या. पण तेवढ्याने ही कठीण समस्या सुटणार कशी? शासनयंत्रणाच खिळखिळी झाली असा याचा अर्थ नाही का?

पण शासनयंत्रणा आतूनदेखील कशी पोखरली गेली आहे ते पाहा. कम्युनिस्ट आणि पाकिस्तानला अनुकूल असलेल्या मुसलमान अधिकाऱ्यांची संख्या आसाम सरकारात मोठी आहे. एवढेच नव्हे तर अनेक मोक्याच्या आणि वरच्या जागांवर ते आहेत. पाकिस्तानी घुसखोर आणि सर्वच पंचमस्तंभीयांना त्यांची सहानुभूती असते. हे उघड आहे, की कोठलीही राष्ट्रहिताची गोष्ट केंद्रीय किंवा राज्य सरकारने करायची-असे म्हटले तर ती नीटपणे अमलात आणता येईल याची कोणालाच खात्री नाही. परवाच घडलेली घटना त्या दृष्टीने बोलकी आहे. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जोरहाटपासून चौदा मैलांवर मिळालेल्या बातमीवरून पोलिसांनी आसाम सरकार उलथून पाडण्याचा नागा व कम्युनिस्टांनी केलेला कट उघडकीस आणला. चौकशी नंतर या सर्व कटाचा सूत्रधार शाह सय्यद हुसेन नावाचा डाव्या कम्युनिस्ट पार्टीचा नेता आहे हे लक्षात आले. त्याला पकडण्याचे ठरले. पण पोलिस त्याला पकडायला जाण्याचे अगोदर तीन तास त्याला एका पोलिस अधिकाऱ्याकडूनच ही सूचना मिळाली आणि अजूनही तो बेपत्ता आहे. अर्थात पोलिसांच्या हातात सापडला नाही.

केंद्रीय नेतृत्व आणि शासनयंत्रणा यांची स्थिती आसाममध्ये अशी विचित्र आहे. चीन-पाकिस्तान आक्रमण करण्याच्या तयारीत आहेत. नागा-मिझो यांच्याशी चकमकी चालूच आहेत. खासी–गारोंचे आंदोलन चालू आहे. पाकिस्तानी घुसखोर आणि कम्युनिस्ट यांच्या हालचालीही वाढत आहेत. हे आणि इतर अनेक घातक प्रकार चालू असतानादेखील समाधानाची एकच गोष्ट आहे ती म्हणजे आसामची-विशेषत: ब्रह्मपुत्रा खोऱ्यातील–जनता एकनिष्ठपणे भारत सरकारच्या पाठीशी आहे. परंतु गेल्या वीस वर्षांच्या आमच्या दिवाळखोर नेतृत्वाने आपल्या हाताने ही एकजूटदेखील घालविण्याचे श्रेय प्राप्त केले आहे ! ○

## □ अमेरिकन निग्रोंचा समानतेचा लढा

मार्टिन ल्यूथर किंग यांचे एक निकटवर्ती सहकारी डॉ. रल्फ ॲबरनाथी नुकतेच भारतात येऊन अमेरिकन निग्रोंच्या समानता लढ्याची माहिती देऊन गेले. स्वातंत्र्य व समानता प्राप्त करण्यासाठी अमेरिकेतील निग्रो समाज लवकरच सविनय कायदेभंगाची देशव्यापी चळवळ सुरू करणार आहे. हा लढा विजय मिळेपर्यंत थांबणार नाही. अमेरिका स्थापन करणाऱ्या नेत्यांनी जो ' मानवी हक्कांचा जाहीरनामा ' तयार केला तो अजून पूर्णांगाने आचरणात उतरलेला नाही. स्वातंत्र्य–लढ्यासाठी अहिंसेचे साधन स्वीकारण्याच्या बाबतीत अमेरिकन निग्रोंनी महात्मा गांधींचे अनुकरण केले आहे. " प्रायश्चित्तात्मक आत्मक्लेशांतून सामर्थ्य निर्माण होते असा आमचा विश्वास आहे. "

# । । चेहरा । ।



वि ज य तें डु ल क र

चेहऱ्यांवरून आपण माणसांच्या स्वभावाची पारख करतो. ती प्रत्यक्षात किती अचूक ठरते तो झाला वेगळा प्रश्न. पण रुपेरी पडद्याच्या भव्य चौकटीत, आपणा माणसांच्या या प्रवृत्तीमुळेच, नटाच्या किंवा नटीच्या चेहऱ्याला अत्यंत महत्त्व येते. वास्तवापेक्षा कित्येक पटींनी मोठा करून हा चेहरा आपल्यासारख्या प्रेक्षकांवर ' लादता ' येतो आणि त्या द्वारे एक स्वभाव आणि त्या स्वभावाचा खराखोटा माणूस निखालसपणे प्रस्थापित करता येतो. अशा एका किंवा अनेक स्वभावांच्या आणि माणसांच्या परस्परसंबंधाचे एक कथानक प्रभावीपणे जिवंत करता येते. त्याद्वारे एखादा कलात्मक, प्रचारकी वा केवळ व्यापारी हेतू निर्मात्यांना साधता येतो.

तसे पाहिले तर नाटकाच्या रंगमंचावरही मुद्राभिनयाला स्थान आहेच. परंतु तिथे केवळ एखाद्या चेहऱ्याद्वारे फारसे काही प्रेक्षकांवर ' लादता ' येत नाही. नटाचे उभे व्यक्तिमत्त्व तिथे आपल्यावर परिणाम करीत असते. त्याहूनही नटाचा शब्द तिथे प्रभावी ठरतो. या शब्दाच्या कमजास्त ठाशीव, उच्च वा दबल्या स्वरातल्या उच्चारणाने एखादा विचार, एखादे तत्त्व, किंवा केवळ एखादी भावना वा एखादा विनोद-देखील या माध्यमाद्वारे कित्येकदा आपल्यावर 'लादला' गेलेला आपण पाहतो. म्हणजे वस्तुत: तो विचार किंवा ते तत्त्व आपल्याला तेवढेसे पटलेले नसते; परंतु तरीही तात्कालिक प्रभावाने का होईना, आपण त्यावर उ:त्स्फूर्तपणे टाळी मारतो. भावनेने अकारण गहिवरतो, विनोदावर–वस्तुत: तो मोठासा चमकदार आणि ताजा नसताही–हसतो. मी ' लादणे ' म्हणतो ते या अर्थाने.

रुपेरी पडद्यावर तसे पहिले तर शब्द असतोच; त्याचा एक प्रभावदेखील असतो. परंतु पडद्यावरून चेहऱ्याच्या 'क्लोज-अप' नामक अगदी निकट दर्शनाने प्रेक्षकावर जे, जसे, जितक्या थेटपणे आणि खोलपर्यंत लादता येते तसे ते शब्दाने लादता येत नाही, एवढे खरे.

रुपेरी पडद्यावरचे चेहरे आठवावेत. ज्याच्या दर्शनाने अंगभर भीतीचा काटा उठे तो इंग्रजी चित्रपटसृष्टीतला 'फ्रॅकेन्स्टीन'च घ्या. याची भूमिका बोरिस कारलॉफ हा नट करी. फ्रॅकेन्स्टीन हे वास्तव नव्हते; ती एक चित्तथरारक, महाभयंकर कल्पना होती. ते एक भयानक स्वप्न होते. कारलॉफने कुशल रंगभूषेद्वारा उभा केलेला वेडाविद्रा, अती कुरूप अशा अविस्मरणीय चेहऱ्याचा फ्रॅकेन्स्टीन त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण आणि किळसवाण्या चेहऱ्यानेच त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या आणि कृतींच्या भयानक स्वप्नासकट आपल्या मनावर ठसला. त्याच्या सर्व कृती आपण घटका दोन घटका का होईना, खऱ्या मानल्या, त्या अद्‌भुत अवास्तव भीषण जगात स्वतःला विसरून पोटातल्या भीतीच्या भल्यामोठ्या खड्ड्यांसकट जगलो ते—आता नीट आठवले तर—प्रामुख्याने त्या चेहऱ्याने झपाटले जाऊन.

याउलट लॉरेल-हार्डीची आपल्याला निखळ हास्याचे अमाप ठेवे देऊन गेलेली, आता अस्तंगत दुक्कल आठवावी. प्रथम आठवतात ते, ते दोन विलक्षण हास्यकारक, लोभस, निरागस, बोलके चेहरेच. या चेहऱ्यांची 'बोटे धरून' आपण या दोघांच्या अत्यंत अवास्तव, भन्नाट अनुभवातून पोटे धरधरून हसत फरफटके केले. या चेहऱ्यांमुळेच यांचे कसलेही न भूतो न भविष्यती वेडेचार आपण निःशंक मनांनी पाहिले, आस्वादिले. ती निष्पाप, घसरत्या, आपटत्या, धावत्या, लोळत्या, माणसांची दुनिया तात्पुरती निखालस खरी मानली.

चार्ली चाप्लिन म्हटले की नंतर आपल्या मनात येते ती आडमाप तुमान, तिच्यातले तुरतुरते 'सशाचे' पाय, पण प्रथम समोर उभा राहतो तो चौकोनी मिशांचा आणि करुण, बोलक्या डोळ्यांचा लांबट चेहरा. या चेहऱ्यानेच चार्लीचे हास्यापद आणि अबोल—धडपडते—असफल—सदा आशावादी व्यक्तिमत्त्व आपण अस्सल मानले, त्याला बूट शिजवून खातानाही विश्वासाने, मजेने, सहानुभूतीने पाहिले.

आपल्याकडची उदाहरणे घ्यायची तर मास्टर विनायक, चंद्रमोहन, विष्णुपंत पागनीस, मोतीलाल, दुर्गाबाई खोटे, मास्टर छोटू हे रुपेरी पडद्यावरचे काही गाजलेले जुन चेहरे आठवावेत. या चेहऱ्यांनी आपल्या मनात एकेक ठाशीव व्यक्तिमत्त्व टिकाऊ स्वरूपात उभे केले. मास्टर विनायक म्हणजे तारुण्यातला निर्भर आणि नादी उत्साह, चंद्रमोहन म्हणजे निखाऱ्यासासारखे ज्वलंत मर्दानी तेज, पागनीस म्हणजे पाझरती भक्ती, मोतीलाल म्हणजे उमदी खुशालचेंडू वृत्ती, दुर्गाबाई म्हणजे खानदानी रुबाब ही समीकरणे त्या काळी फार लवकर आणि पक्की बसली.

विनायकरावांची उंची किती होती आणि चंद्रमोहन' डावखोरा होता काय हे आपल्याला जाणवलेलेही नाही. पागनिसांनी 'तुकाराम' चित्रपटात गायिलेले अभंग तुकारामाचे नव्हते याचा विचारही आपण कधी केला नाही. मुख्यतः या चेहऱ्यांनी असल्या शंकाकुशंकांपलीकडे आपल्याला नेले आणि ठेवले.

## वैशिष्टयपूर्ण चेहरा

असे सध्याचे एक मोठे उदाहरण द्यायचे तर सुलोचना या लोकप्रिय अभिनेत्रीच्या चेहऱ्याचे देता येईल. तुलनेने इतर सद्यःकालीन मराठी अभिनेत्रींनाही एकेक प्रेक्षणीय चेहरा आहेच; त्याला त्याची अशी नाकडोळयांची वैशिष्टयेही विधात्याने आणि रंगभूषाशास्त्राने दिली आहेत. त्या आपल्या परी अभिनयही कसबाने करतात. तरीही चेहरा म्हणून सुलोचनाबाईंच्या चेहऱ्याला रुपेरी पडद्याच्या भव्य चौकटीत जे सामर्थ्य प्राप्त होऊन राहिले आहे ते या नटींच्या चेहऱ्यांना प्राप्त होत नाही. गेली पंचवीस वर्षे हा चेहरा पडद्यावर सातत्याने राहात आला आहे. यातली सुमारे वीस वर्षे ठळक भूमिकातून हा आपल्यापुढे आला आहे. या बरोबरचे अनेक चेहरे अस्तंगत झाले, काहींना आपण विटलो, काहींना निर्माते विटले पण सुलोचना-बाईंचा चेहरा मात्र अजून, जसा 'सूनबाई' या भालजी पेंढारकरांच्या खूप जुन्या चित्रपटात टवटवीत होता तसाच आजही एखाद्या नव्या हिंदी-मराठी चित्रपटात आहे. आजही हा चेहरा आपल्याला उत्सुकतेने पाहावासा वाटतो, एखादी पुरेशी वेधक भूमिका त्याला असेल तर तो आजही आपल्यावर प्रभाव टाकतो, आपल्याला या व्यवहारी जगातून निखळ वात्सल्य-कारुण्यादी भावनांच्या दहिवराने शिंपलेल्या एका रम्य हिरव्यागार स्वप्न भूमीत बघता बघता उचलून नेतो.

रुपेरी पडद्यावरच्या आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या कालखंडात आपल्याला शुद्ध मराठी मुळीच बोलता येत नव्हते असे सुलोचनाबाई सांगतात; या पायी आपण काही चित्रपटांतून केलेल्या आणि नंतर गाजलेल्या भूमिका आपल्याला करू देण्याला जबाबदार संबंधितांनी आरंभी विरोधदेखील केला असे त्या म्हणतात; तेव्हा त्यात आपल्याला मुळीच आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. शब्द ही मुळी त्यांची पडद्यावरची भाषा नव्हतीच. शब्द हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे या माध्यमा-पुरते तरी बळ नव्हते. त्यांचे व्यक्तिमत्त्व खरोखरी उमटत होते, बोलत होते ते मुख्यतः त्यांच्या चेहऱ्याद्वारे. हे ज्यांच्या नजरेने जाणले त्यांचा विरोध मावळला. ज्यांचा राहिला त्यांना चित्रपट पाहिल्यावर आपली चूक कबूल करावी लागली. यामागे सुलोचनाबाईंनी भूमिकेला साजेशा शुद्ध आणि स्वच्छ शब्दोच्चारणासाठी घेतलेली अपार मेहनत कारणीभूत होती हे खरे तसेच, किंबहुना त्याहीपेक्षा, कित्येक शब्द जे व्यक्त करू शकणार नाहीत ते हा चेहरा लीलया व्यक्त करीत होता हे महत्त्वाचे कारण असले पाहिजे. शुद्ध भाषेची अंगची उणीव या नटीला रुपेरी पडद्यावरच्या कर्तृत्वापासून दूर ठेवू शकली नाही त्याचे सर्वस्वी कारण या

माध्यमासाठीच जणू घडलेला तिचा वैशिष्टयपूर्ण चेहरा होय.

या चेहऱ्याचे सामर्थ्य नेमके आहे तरी कोणत्या स्वरूपाचे ?

हा रेखीव आणि गोड आहे; पण मराठी हिंदी चित्रपटांतल्या अनेक लोकप्रिय चित्रतारकांच्या चेहऱ्यासारखा केवळ तेवढाच नाही. किंवा विलक्षण रेखीव–एखाद्या शिल्पासारखा जड नाही. (उदाहरणार्थः राजश्री या अलीकडल्या हिंदी चित्रपट तारकेचा चेहरा.) हा जयश्री या जुन्या चित्रपटतारकेच्या चेहऱ्यासारखा बालिशपणे गहिरा नाही की एके काळच्या हंसा वाडकर, संध्या, किंवा आजची शर्मिला टागोर यांच्याप्रमाणे उन्मादक आणि उद्दीपक नाही. उषाकिरण या जुन्या गुणी चित्रपट तारकेच्या चेहऱ्याचा मोहक घरेलू साधेपणा त्यात नाही. त्याचे आकर्षण याहून वेगळे आहे.

## रुपेरी पडद्यासाठीच......

एक तर हा चेहरा अपार विश्वास देणारा आहे. पडद्यावर तो समोर येताच आपल्याला जसा आधार भेटतो. आपण मनोमन निर्भर आणि प्रसन्न होतो. प्राजक्ताच्या फुलांचा सडाच सडा समोवती पडावा तसे आत-आत सुखावतो. या चेहऱ्याचे दुसरे वैशिष्टच म्हणजे हा पावित्र्याने ओथंबलेला वाटतो. हा आपल्याला निःशंक करतो. व्यवहारापासून एका वेगळया जगात नेत रहातो. याला सोसावे लागणारे हाल–कष्ट, अवहेलना यांनाही साध्या व्यावहारिक कटकटींचा अर्थ राहात नाही. ती एका आत्म्याची सत्त्वपरीक्षा होते. या सत्त्वपरीक्षेतून बावन्न कशी सोने उजळून निघत असल्याचा विशेष अनुभव आपण पडद्यावरची बरीवाईट कथा मनाने जगत घेतो. असा अनुभव आपल्या चित्रपटातून अन्य कोणतीही अभिनेत्री देऊ शकत नाही असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

गंमत म्हणजे रुपेरी पडदा सोडून सत्यसृष्टीत हा पाहिला तर या चेहऱ्याचे हे गुणधर्म जाणवत नाहीत. तो सामान्य वाटतो. सर्वसाधारणपणे रेखीव वाटतो. असे आणखी चेहरे आपण पाहिले आहेत असे वाटते. रुपेरी पडद्यावर येताना मात्र जणू त्याचा संपूर्ण कायापालट घडतो. काही एका गूढ सामर्थ्याने तो मंतरला जातो आणि एका दिव्य सृष्टीचा तो प्रतिनिधी बनतो. या चेहऱ्याचे सामर्थ्य, म्हणूनच, सर्वस्वी रुपेरी पडद्यावरचे आणि रुपेरी पडद्यासाठीच आहे. असे म्हणावेसे वाटते.

या चेहऱ्याच्या याच गुणधर्मामुळे हा कधी तमासगिरीण, नर्तकी, विदुषी, खलनायिका असल्या भूमिकांत आपल्याला आणि बव्हंशी निर्मात्या–दिग्दर्शकांनाही पाहणे शक्य झाले नाही. त्या पातळीवर हा उतरूच शकत नाही. आणि हाल–कष्ट, मानसिक यातना, छळ, उपेक्षा, अपसमज, आपत्ती यांतून कितीही वेळा तो गेला तरी आपल्याला त्याचा कंटाळा म्हणून येत नाही. एखादी रटाळ, वातड कथाही केवळ याच्या दर्शनाने अंशतः प्रेक्षणीय आणि मनोज्ञदेखील वाटून जाते.

या चेहऱ्याचे डोळे स्त्रीसुलभ मर्यादा आणि वात्सल्य बोलतात. याचे ओठ

कारुण्यातल्या दबल्या, सुप्तवेदना अतिशय संवेदनाक्षमपणे व्यक्त करतात. याच्या गालावरची प्रसंगोपात उमटणारी खळी क्षणिक लडिवाळ प्रसन्नता देऊन जाते. याचे नाक आणि जिवणी मूर्तिमंत कोमलतेचा प्रत्यय देतात. डोक्यावरून भरड लुगड्याचा ठिगळला पदर आला की हा चेहरा श्रमजीवी आणि भावडा होतो. भरजरी शालूचा झगमगता पदर घेतला की हाच चेहरा पिढीजात राजबिंडा होतो. वृद्धपणाच्या रंगभूषेत हा अंतर्बाह्य तपस्वी वाटतो, कुशीत तान्हे अर्भक दिले की हा जगण्या विषयीच्या उत्साहाने नुसता वहरून उठतो.

विशेष हे की तसे जाणते, व्यासंगी आणि हिशेबी अभिनयकौशल्य जवळ नसता या नटीच्या चेहऱ्याचे हे असे विविध प्रकार होतात. तिला भूमिकेत नेऊन ठेवून प्रसंग समजावला की चपखलपणे आणि सहजी त्या भूमिकेतून ती त्या प्रसंगात खोलवर आणि पुरेपूर पोचते असे तिचे दिग्दर्शक सांगतात. या चेहऱ्यामागे त्याच्या बाह्यवैशिष्ट्यांबरोबरच, एक अंगचीच आणि अबोध अशी जीवनाची, स्त्रीत्वाची उत्तम जाण आहे, असा याचा अर्थ होतो. हिशेबी अभिनय–कौशल्याचे काम ही उत्स्फूर्त जाण अचूक बजावीत असावी. सुलोचना नावाचा हा सदा टवटवीत, चैतन्यमय चेहरा भूमिका करीत नाही, तिचा प्रत्येक क्षण तो जगतो. आणि जगताना त्या भूमिकेला दिव्यत्वाचा, पावित्र्याचा स्पर्श आपल्या वैशिष्ट्यांनी, अभावितपणेच, देत असतो.

काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे ॲण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

सुलोचनाबाई आपण अभिनयाचे शिक्षण कुठेही घेतले नाही किंवा अभिनयाचा प्रत्यक्ष सरावदेखील संस्कारक्षम वयात आपल्याला कधी घडला नाही असे म्हणतात, किंवा विशिष्ट भूमिका कशी आत्मसात केली हे सांगण्याला असमर्थ ठरतात तेव्हा त्याचा अर्थ हाच असतो. त्या मुळी अभिनय करीतच नाहीत. त्या ती भूमिका जगतात. या कामी कॅमेरा, झगझगीत प्रकाशझोत, बंदिस्त हालचाली, तुटक तुटक दृश्यांची चित्रीकरणे यातल्या कशानेही विक्षप येत नाही कारण अष्टौप्रहर भरल्या, गजबजल्या घरात स्वतःचे एक भाव–विश्व जपणाऱ्या आणि जगणाऱ्या गृहिणीसारखी चित्रपटमाध्यमाच्या या तांत्रिक व्याप–तापांना ही नटी केव्हाच चांगली सरावली आहे. त्यातच तिचे त्या त्या भूमिकेतले भावविश्व चांगले फुलते. विशिष्ट माध्यमासाठी घडलेल्या कलावंताला त्या माध्यमाची तांत्रिक बंधने कधीही काचत नाहीत; उलट त्यातच त्याला हवी ती भावनिक मुक्ती हुकमी गवसते. या संबंधात सुलोचनाबाईंचे एक वाक्य उल्लेखनीय आहे. त्या सांगतात की पूजा करावी तितकी मनापासून मी सेटवर माझी भूमिका करते. चित्रपट निर्मितीच्या यांत्रिक, रुक्ष, बकाल, बजबजल्या वातावरणात ही नटी सर्वस्वाने जीवनाला भेटते; हे जीवन आपल्या उभ्या व्यक्तिमत्त्वाने पुजते. आणि मग पडद्यावरची एखादी तकलादू, रद्दड कथादेखील इच्छा नसताना आपण अखेरपर्यंत पाहतो—केवळ या चेहऱ्यामुळे.

हिंदी–मराठी चित्रपट सृष्टीत नवे ‘चेहरे’ आजकाल दिसतात, पण सुलोचनाबाई, विष्णुपंत पागनीस, चंद्रमोहन, मास्टर छोटू, मोतीलाल, दुर्गाबाई खोटे असे वैशिष्टचसंपन्न, समर्थ, बोलके चेहरे मात्र दुर्मिळ झाले आहेत. ¤

# आणि चेहरा

विशिष्ट वयात, बचकाभर पावडर कशीबशी फासून लचकत चालणारी कोणतीही फटाकडी तरुण पोर सुंदर भासते.

परंतु स्त्री–सौंदर्य म्हणून काही वेगळी आणि फार अवघड चीज असते हे मुंबईच्या फोर्टकुलाब्याकडे एक चक्कर टाकली की लक्षात येते. सुंदर दिसण्याच्या हातघाईच्या प्रयत्नात रूपाचे बेरूप किंवा बेरूपाचे आणखी विद्रूप करून फिरणाऱ्या हव्या तितक्या केविलवाण्या रंगीत भावल्या आपल्याला तिथे पावलोपावली भेटतात. केसांचे नारळ नाहीतर भोपळे बांधलेले, पापण्यांच्या कडांना हिरवे निळे

रंग चोपडलेले, डोळयांचे कोपरे वर वळवलेले रेखून चेटकिणीसारखे करून टाकलेले, मुद्दाम तेलकट केलेल्या चेहऱ्यांच्या गालावर गुलाबी रंगांचे डाग पाडून ओठांना कोड फुटावे तसे लिपस्टिक फासलेले ( बाकीचे वर्णन तूर्त राहू द्या; ) असले हे स्त्रीत्वाचे एकाहून एक भीषण नमुने पाहिले की स्त्रीवरचीच काय पण अन्नावरचीदेखील वासना उडते आणि सुंदर दिसणे सोपे नाही हे कळते.

हे सगळे केसांचे प्रकार, चेहऱ्याचे रंग आणि तेले, यांतून सौंदर्य तरी कोणते निर्माण होते हा माझ्या पुढे बऱ्याच दिवसांपासून एक प्रश्न होता. हा सुटण्याची संधी नुकतीच आयती चालून आली.

त्याचे काय झाले, मुंबईपासून थोड्या अंतरावर जूहू म्हणून एक समुद्रकिनारा आहे. गुलहौशी मंडळीचा वावर इथे खास करून असतो. या गुलहौशी मंडळीसाठीच या भागात काही वसतीची हॉटेले चालतात. त्यात 'सन अँड सँड' म्हणून एक उंची हॉटेल आहे. इथे मुख्यत्वेकरून परदेशी गुलहौशे आणि हंसी उतरतात. या हॉटेलात एक प्रेक्षणीय प्रात्यक्षिक झाले. एअर इंडिया या विमान वाहतूक संघटनेच्या हवाई सुंदरींसाठी हे प्रात्यक्षिक योजलेले होते. दोन परदेशी लेड्या हे प्रात्यक्षिक देण्यासाठी मुद्दाम पॅरिसहून आणवण्यात आल्या होत्या. तिकडे पॅरीसमध्ये महाभयानक अराजकाचे एक प्रचंड प्रात्याक्षिक गॉल महाशयांपुढे चालले असता हे लावण्याचे छोटेसे चुटचुटीत प्रात्यक्षिक या फ्रेंच बायांनी, जमलेल्या मुळातल्याच एकाहून एक लावण्यवतींच्या थव्याला सुमारे तासाभरात दाखवले आणि बायकांत पुरुष म्हणून जमलेले तमाम 'लांबोडे' पत्रप्रतिनिधी खूष होऊन गेले. लावण्याची एक रंगदार मैफलच तिथे त्या निमित्ताने घडली म्हणा ना. श्रोते सुंदर, व्याख्याते सुंदर, विषयही सुंदर !

या पाहुण्या सौंदर्य–तज्ज्ञ सुंदरींची नावे होती अनुक्रमे कोलेत डिलाइल आणि मार्ताइत फ्‌व्रितर्‌ (फ्‌ ओठांचा आकर्षक द्रोण करून उच्चारायचा आणि 'व्रितर' म्हणू ना, तसे व्रितर्‌ म्हणायचे. नावे उच्चारतानाही सौंदर्य बिनसता कामा नये.) त्यांच्या या प्रात्यक्षिकाचे नाव होते ऑपरेशन ट्रान्स्फॉर्मेशन. (एक चावट पत्रप्रतिनिधी गुणगुणला की फॅमिली प्लॅनिंगच्या ऑपरेशनच्या या काळात इतके आल्हाद–दायक ऑपरेशन म्हणजे फारच ! )

प्रथम कोलेतबाईने सौंदर्य–शास्त्राचे महत्त्व सुंदर शैलीत, सुंदर हावभावांनी वर्णन केले. हे शास्त्र आणि तंत्र सुयोग्य तऱ्हेने वापरले तर नव्हत्याचे होते आणि होत्याचे नव्हते करता येते हा या लाडिक इंग्रजीतल्या प्रास्ताविकाचा सारांश होता. होत्याचे नव्हते झाल्याची चित्तथरारक उदाहरणे तर कुलाब्याला भेटतातच; नव्हत्याची होते झाल्याची उदाहरणे मात्र त्या मानाने दुर्मिळ. (उपस्थित हवाई सुंदरीमध्येच त्यातली काही बारकाईने पाहिल्यास, दिसत होती.) प्रास्ताविकानंतर लगेच एका हवाई सुंदरीला कोलेत बाईने पाचारण केले, आयना मांडलेल्या एका

आसनात बसवले आणि आपली सिंहकटी कसून तिच्यावर आपले हातखंडा सुंदर 'ऑपरेशन' आपल्या मदतनीस मार्ताइनच्या साहाय्याने आरंभले.

खरे तर ही आसनस्थ हवाई-सुंदरी मुळातच विलोल-नेत्रा, स्मित-वदना मोहिनी होती. हिच्यावर सौंदर्याचे ऑपरेशन कशाकरिता ? पण एअर इंडियाच्या त्या हवाई सुन्दरींच्या थव्यात रूपहीन अनाकर्षक चेहरा कोठून मिळायला ?

आम्ही उत्सुकतेने पाहात होतो. कुंचले, पेन्सिली आणि रंग यांचा नाजूक देखणा रंगीबेरंगी पसारा हाताशी मांडून कोलेतबाई एखादे पेंटिंग रंगवावे तितक्या एकाग्रतेने पण त्याहून खूप जलद गतीने पुढ्यातला चेहरा रंगवीत होती. प्रथम तिने चेहऱ्याची त्वचा विचारात घेतली, मग डोळ्यांकडे लक्ष वळवले आणि पाठोपाठ ओठ झडपले. चेहऱ्यावर एकेक परिणाम साधणारे बाईचे नाजूक, प्रमाणबद्ध, गौरवर्ण डौलदार हात आणि बोटे पाहणे हाही सौंदर्याच्या तंत्रमंत्रातला एक स्वतंत्र धडा ठरला असता, इतके हे हात सुंदर राखले – जोपासलेले होते. केवळ या अशा हातांसाठीदेखील एखाद्या बाईशी तुम्ही-आम्ही शक्य असते तर लग्न केले असते ! (हातापासून हृदय दीड हात दूर असते ते सोडा...)

## 'फुल टाईम' नाद

सुमारे अर्धा तास हे प्रात्याक्षिक चालू होते. अर्धा तास उपस्थित स्त्री-वर्ग प्रात्यक्षिकाचा विषय अशा त्या आसनस्थ हवाई सुंदरीच्या निमित्तमात्र चेहऱ्याकडे विस्फारल्या नजरांनी एकटक पाहून कल्पनेने जणू आपापल्या चेहऱ्याचा कायापालट अनुभवीत होता. अर्ध्या तासाने प्रेक्षकांना जवळ पाचारिण्यात आले. काय गंमत ! त्या एका हवाईसुंदरीच्या कोलेतबाईच्या कृपेने दोन सुंदरी झाल्या होत्या ! तिच्या एकाच चेहऱ्यात कोलेतबाईने दोन अर्धे अर्धे चेहरे रंगवले होते आणि दोन्ही वेगवेगळ्या तऱ्हांनी बहुत आकर्षक वाटत होते. कुलाब्याच्या बहुसंख्य सौदर्येच्छू बायांना कोलेतबाईच्या क्लासात सक्तीने घालावे असे वाटण्याइतके दोन्ही रंगवलेले चेहरे बिनरंगवलेले, पुष्कळ नैसर्गिक तरीही मोहक वाटत होते. तंत्राचे खरे यश तंत्र न भासण्यात असते हा कोणत्याही कलेतला नियम आठवला आणि कोलेतबाईच्या कलेची कमाल पटली. परंतु याहूनही कमाल होती ती हे दोन चेहरे एकमेकांशी मुळीच साम्य न सांगणारे होते, ही. एकाच चेहऱ्याचे हे दोन भाग आहेत ही केवळ तारतम्यानेच जाणण्याची गोष्ट उरली होती. स्त्रियांच्या सौंदर्यशास्त्रात, कोणत्या शैलीचे सौंदर्य, याला फार महत्त्व असते असा याचा अर्थ होता. उगाच घे रंग की चोपड तोंडाला, उचल पफ् की मार तोंडावर असला सब घोडे बारा टक्के मामला अव्वल स्त्री-सौंदर्य-शास्त्राला मंजूर नाही. तीही एक कला आहे. कोलेतबाईने दाखवलेली किमया हेच बोलत होती.

कृतकृत्य कोलेतबाईने जाता जाता उंची सिगरेटीचे झुरके घेत हेही सांगितले की सौंदर्याचा हा नाद, इतर नादांप्रमाणे, फार उंची, खर्चिक आणि महागडाच आहे.

चार आण्याच्या खाकी फेस पावडरीत आणि बारा आण्यांच्या स्नोत चेहऱ्याचा सुंदर कायापालट शक्य नाही, त्यासाठी शेकडो रुपये आणि दिवसाकाठी भरपूर वेळ खर्च केला पाहिजे, हा तिच्या म्हणण्याचा आशय होता. आपल्या चेहऱ्यातले दोष पाहण्याइतकी वस्तुनिष्ठता आणि शिवाय कल्पकताही, नाही म्हटले तरी, हवीच. म्हणजे एकंदरीने हा मोठ्या घरचा आणि 'फुल टाइम' नाद होऊ शकत होता, मामुली स्त्रियांनी घांदलघाईत येता जाता भरण्याचे हे काम नव्हते.

काहीशा विषण्णपणेच या सर्वांगसुंदर प्रात्यक्षिकातून मी बाहेर पडलो. आमच्यासारख्यांसाठी हे दुरून पाहून निःश्वास टाकण्याचेच सौंदर्य एकंदरीत ! आमच्या हाती असा कोलेतबाईच्या किमयेने सुंदर होणारा एखादा मुखचंद्र कधीच येणार नव्हता.

पण मग या कोलेतबाईलाही नेऊन एक प्रात्यक्षिक दाखवावेसे वाटले. वाटले की सांगावे, मादमॉयझेल कोलेत, तुमची ती तेले, लोशने, स्प्रे, मसाज, फौंडेशने, रंग, कुंचले, पेन्सिली, पावडरी, खोट्या पापण्या, लिपस्टिकच्या कांड्या, केसांच्या जटा आणि शेपट्या जरा बाजूस ठेवून आमच्या मामुली माणसांच्या घरी डोकवा. घरात वावरणारा, चण्याचे पीठ नाहीतर गव्हाचा मैदा नाकाला आणि गालाला लागलेला, कामाच्या व्यापात केसांच्या बटा नाकाशी चिकटलेला, घामाने कपाळीचे कुंकू नाकाच्या पार शेंड्यापर्यंत उतरलेला मुखचंद्रमा पाहा. हा तुमच्या सौंदर्यशास्त्रात बसतो काय ?

नाही बसत ?

मग तुमचे सौंदर्यशास्त्र वेगळे आहे. नव्हे, फुकट आहे.

आमच्या सौंदर्यशास्त्रान्वये मा. मा. कोलेत, हा चेहरा फार फार सुंदर ठरतो. असा सुंदर चेहरा कधी कधी साऱ्या जगात नसतो. इतका की अनावर होऊन— जाऊ द्या. मतलब तुमच्या फ्रेंच ध्यानात येईलच.

## प्रचंड उद्योगधंदा

नाही, सौंदर्याच्या या ध्यासापायी कोलेतबाईच्या महागड्या सौंदर्यशास्त्रानुसार खर्च करायचे म्हटले तर तो किती होऊ शकतो, आहे ठाऊक ? अमेरिकेत या एवढ्या एका गोष्टीसाठी बायकामंडळी सालीना एकूण सुमारे तीन अब्ज पन्नास कोटी रुपये खर्ची घालतात ! या खर्चावर कृत्रिम सौंदर्याचा एक मोठा उद्योगधंदाच तिथे उभा राहिला आहे आणि तो तेजीमंदीचा यत्किंचितसुद्धा परिणाम न होता एकसारखा वाढतोच आहे. त्याच्या वाढीसाठी जाहिरातींची, नवनव्या कल्पनांची, आकर्षक नावांची वीण काढण्यासाठी हजारो माणसे लठ्ठ पगारावर बसलेली आहेत. मालाच्या विक्रीसाठी टोलेजंग खर्च करून आकर्षक मुली मिळवून त्यांना विक्री–तंत्रात तरबेज करण्यात येत असते. (मादमॉयझेल कोलेत अशा मुलींतूनच वर आलेली बाई :) मालाच्या किमती एकसेएक वरचढ ठेवण्याचीच स्पर्धा चालू असते. कारण त्यामुळेच

माल रामबाण आणि प्रभावी भासतो असा मानसशास्त्रीय संशोधनाचा (हेही या उद्योगातर्फे करण्यात येते!) निष्कर्ष आहे. त्यामुळे खर्च कमी, मिळकत चढ अशी या धंद्यात (स्पर्धेत तगेल त्याची) बरकत असते. पाच–सात रुपयांना विकले जाणारे लिपस्टिक कंपनीला घरात आठ–दहा आण्यांना पडलेले असते. कुणी सिलिकोन नामक द्रवाचे इंजेक्शन चरबी हटवण्यासाठी बाजारात मांडतो तर कुणी कासवाचे तेल चेहऱ्याची त्वचा ओलसर ठेवण्यासाठी सुंदर बाटल्यात भरून प्रसिद्धीस आणतो. कुणाला तर गर्भातील प्राण्यांच्या इंद्रियांची इंजेक्शने नवयौवनप्राप्तीसाठी सुचतात! महत्त्व नाविन्याला आणि लक्ष वेधून घेण्याच्या ताकदीला असते. बाकी, प्रत्यक्षात गुण शारीरिक त्याहून मानसिकच अधिक असतो. सर्व कंपन्यांच्या बनावटींच्या लिपस्टिकचा मूलभूत फॉर्म्युला किती झाले तरी एकच; मग वैचित्र्य येते ते नावात आणि जाहिरातीत–कधी कधी सर्वांहून चढ किंमतीत!


दिवसचे दिवस म्हणे या व्यापारी सौंदर्यशास्त्रामागे लागलेल्या सौंदर्येच्छू बाया एवढ्याच एका ध्यासाने पछाडून घेऊन सुंदर दिसण्यात सर्व वेळ गढलेल्या असतात. शरीरसौंदर्यापलीकडे त्यांना दुसरे आयुष्य राहिलेले नसते.


असोत बिचाऱ्या. त्यांचे नवरे त्याहून बिचारे.

कोलेतबाईंच्या आणि जी कंपनी त्यांना सौंदर्यशास्त्राच्या प्रसारासाठी भरपूर पगार देते, त्या रेव्हलॉन कंपनीच्या व्याख्येने सौंदर्य प्रसाधनात असते. आमच्या मते, फार फार पुरातन काळापासून अगदी आजतागायत, सौंदर्य निसर्गात असत आले आहे.

'प्राप्तेषु षोडशे वर्षे गर्दभी अप्सरा भवेत्' हे हजारो वर्षांमागे आमच्या एका रसिक पूर्वजाने म्हणून ठेवलेले स्त्री–सौंदर्याचे आदितत्त्व व्यापारी सौंदर्यशास्त्राला पुरून उरणारे आणि चिरकाल सत्य ठरणारे आहे.

शिवाय ते बिनखर्चाचे आणि अगदी सहजगत्या घडणारे आहे, हे विशेष! ○






## दुवा !


भ्रमरा ! तू मधुलुब्ध होउनी
करीत आलासी गुंजारव
रुंजी घालुनि माझ्या भंवतीं
चुंबिलेस तव अपूर्व लाघव !
कमलांतिल मकरंद चाखुनी
गुंगत कोठें निघुनी जासी
आसुसलें रे हें माझें मन
पुन्हां धराया तुज हृदयाशीं !
नीरस माझें झालें जीवन
विसरलासि ! कधिं फिरुनी येशिल ?
'क्षमा' नांव धरतीचें स्त्रीचे
दुवा तुला माझे मन देइल !
एक दिवस परि येइल जीवनिं
हळहळेल तव मानस भोळे
श्रावणातल्या आभाळापरि
भरुनि अश्रुनी येतिल डोळे !

*स. ना. दीक्षित*

## श्री

दैव, प्रारब्ध ही,
मोठी मोठी नावे ।
विश्वमार्गातली,
विसाव्याची गावे ॥ १ ॥
थकली पाऊले,
तिथे थांबतात ।
जगण्यासारखे,
काही शोधतात ॥ २ ॥
गवसता कण
नियतीचे दारी ।
आंबल्या पायांत,
पुन्हा ये उभारी ॥ ३ ॥

*सौ. इंदिरा कुलकर्णी*



## वर्षा

अन्धारल्या दिशा
कडाडले आकाश
तुटले अन् वायूचे
अनन्त सारे पाश– !
भांबावली वसुधा
धुळीच्या मिठींत
विश्व अवघे तडफडे
भोवऱ्यांच्या जाळ्यात ––!
अचानक ठेंचाळली
प्रकाशाची पाउलें
कृष्ण–वर्णी चेकाळली
जलदांची भिताडे—!
कडाडली वीज
स्पर्शून क्षितीज
...पिसाट...उन्मत्त...
कोसळली धार––!

*बा. श्री. विद्वांस*

## पुनव

विश्व लावून टक
सकौतुक पाहते
चांदण्या प्रवाहात
अन् पुनव न्हाते
नभांगणात उभी
वस्त्र निळे नेसते
चंदेरी यौवनाने
वदन विलसते
रात्रीचे दर्पणात
सुंदरपण न्याहळी
कुंकू चंद्राचे लावी
शांत अतीव भाळी

*यमुनात्मज*

## अस्थि

माझ्या मरणानंतर माझी
कविता येथे अमर रहावी
राखेमधूनि रांगोळीची
सुबक रेघ ती हळू रेखावी ॥ १ ॥
मी मृत्युच्या रथात जाता
बघेन माझी कविता दौलत
काव्यावाचून नाही जवळी
या जगती मज काही शाश्वत ॥ २ ॥
माझ्या अस्थि रायगडावर
शिवचरणावर अंति वहाव्या
काही त्यातिल भागिरथीच्या
विठ्ठलचरणी अंति फुलाव्या ॥ ३ ॥
या अस्थिची अक्षत म्हणूनि
दहा दिशांतून फेकून द्याव्या
या अस्थितून अग्नि शलाका
हृदयाहृदयातून फुलाव्या ॥ ४ ॥

*मधुकर जोशी*

शेखर शिवराम पाटील

# स्पान

नजर वळगाच्या वाटेला अडकलो ...... नजरेचो पाखरं गाव-रानातनी फडफडली, अंताची लांब ढेंगाची चाळ वळखली. जीवाला जरा बरं वाटलं. दोनपार टळली होती; तरी उन्हाची तलखली ओसरली नव्हती. मांडवात बसून तिने पानाला चुना लावला. नखुटभर कात तोंडात टाकला. पोपटाच्या चोचीगत तोंड लालबेलाल झालं. एव्हाना अंता आला. ती पटकन उठली. कुल्याखालची घोंगड्याची खोळ तिने डोकीवरून कपाळापर्यंत ओढून घतली. अघळपघळ झालेलं नेसणं नीट केलं. पायातला पदर कमरेला लपेटून पोटाच्या ओटीत खोचून टाकला. नि मान वर केली......

" अगदी बेगईच आलास रं ?"

" आग बेगईच निगालू व्हतं. पण रांज्यची गोजी रानात चुकली; तिला सोदताना जेवनाचा वखोत झाला–"

" दुसऱ्याचे जीवाची पर्वाच नाय तुला. "

" आर्‌र्…"

" काय आर्‌र् ?"

" काय नाय, भ्याली आसल ह्या रानात माझी रानी."

" वुन्हाला ?"

" आगो भूताखेतांना–"



" हल्. भितो वाटाया एकली थोरीच व्हतू ?"

" मंग  मंग कोन व्हता ?"

ती चरकली. दचकली. नजरेची बिब्बुळ पांढरी पडल्यागत झाली. नी जराशी लाजली. तिरक्या नजरेनं त्याला टिरीत बोलली.

" आर तू व्हतास तो—"

त्याला काहीच अर्थबोध झाला नाही. वेडकागत तोंड वासून तो वरडला ? घुश्यातच.

" आगो, मी आत्ता आलू. मंगशी कोन व्हता—सोबतीला ?"

" मंगशी ?"

" हा हा मंगशी..."

" मंगशी  "

लाजाळूच्या पानागत ती लाजली. तोंड मिटून बसली. तसा तो हिरवानिळा झाला.

" आगो, सांग सांग लवकर."

" आरं जरा सबूर सबूर—"

" जीव खवळलाय. धीर निगत नाय. झटकून सांगून टाक."

" सांगला त काय करशील रं त्याचा ?"

" काय करीन ?"

त्याने दातओठ चावले. फाटलेल्या डोळ्यांनी तिच्याकडे पाहिले.

" आगो काय करीन त्या आत्ता सांगत नाय...पन एक लक्षात ठेव, आज तो तरी जीता -हाईल नायतं..."

" अंता ऽ "

दचकून तिने त्याच्या तोंडावर हात ठेवला. तिचा नूर कोमजलेल्या फुलागत त्याला दिसला. तो मांबावून चरकला, चुकल्या पाड्यागत टुक टुक पाहात राहिला.

" आग्गदीच येडा रं तू. "

" माझ्याशी छपाछप खेळू नको. स्पष्ट सांगून टाक. "

" सांगू ?"

" हं ! "

" सांगच. "

" हं हं सांगच--"

" मंगशी नं अंता......"

त्याच काळीज धडधडलं. ती खुदकन हसली. गालावरल्या रातांब्याना खळी पडली. गोड गोड रस ठिबकला, वडावरल्या लाललोलाल पुटीतनी. टपकन्...टप्...

" येड्या, मंगाशी तुझी आठवन व्हती. आता तू-आलास !"

उथळ पाण्यागत तो हसला. ती पण हसली. खुद् खुद्...खुद्कन्. उभ्या रानात त्यांचा आवाज घुमला. काजूच्या झाडावरल्या चिमण्या दचकल्या. पंख पसरून झुळकीगत थुई थुई उडाल्या. पार पळाल्या.

मेथीच्या माळाची चढण संपली. बोडक्या उताराची वाकडी वाट वळवळत खाली नाहीशी झाली......

" काय ग !"

" अं "

" मंगाशी माझ्ये आठवनीनं त्या मांडवाखालची भूता पळाली वाटतं--"

" देवाचे आटवनीत भूता पलतात बरं अंता !"

" मी देव का हाय ?"

" खराच.. खराच तू..."

मान उचलून तिने त्याच्या कानाशी ओठ नेले. मधाचं पोळं फुटकन फुटलं.

" नायतं मंगाशी भूता पळालीच नसती. "

" चल, येडीच हाईस. "

" हाईच. "

" येडी ?"

" हूं. "

" कोनाची ?"

" तुझी......"

" खरंच...खरंच तुझं वेड लागलंय रे अंता...पण काय करू...काय करू..." डोळ्यातले पाणी तिने कष्टाने मागे सारले; नि त्याच्या पाठसून मोन्यानीच ती चालाया लागली.. उतार मागे पडला, शिवच्या चिंचेजवळून सडक सुतासारखी सरळ गेली...तशी पुढे पडणारी तिची पावले जडावली. काट्यागत जमिनीला रुतून बसली...जावं का पुढे....नको नको, कशाला जायचं ? का म्हणून जायचं ? पण गेलं पाहिजे. गेलंच पाहिजे...आणि नाही गेले तर. तर...उभं आयुष्य दुभंगून जाईल. एक सल आयुष्याला पोखरीत बसेल...एक कहानी अपुरीच राहील...तिचा शेवट आज करायला हवा. हवाच करायला...शिवच्या चिंचेच्या गर्द सावलीतून ती दोघे चालत होती. तिला वाटलं थांबावं जरासं. जरास्स...

" अंता "

" अं. "

" थोपूया जरा. "

" कन्हाला–"

" सावलीला बरं वाटतय रं जरा. उन खोल व्हूंव दे !"

" नको नको "

" का रं—"

" आग कोणी बघला त . "

" आजचा वार कोंता रं ?"

त्याचं बोलणं अर्धवट तोडून ती वारावर आली.

" सोमवार ! "

" म्हंजे बाजाराचा वार. "

" हूं ! "

" आरं मंग जानायेणारी म्हंतीन; बाजाराला जाताना भेटली वाटते. बसली आसतीन. त्यात काय झाला–"

" नको नको. चल झरझर. मकान कापून बाजाराचा पल्ला गाठला पायजे आपल्याला. "

" मर्जी तुझी..."

गती न घेणारी पावले फरफटीत ती त्याच्यामागून चालू लागली, मोन्यानीच सडक तुडवू लागली. बराच वेळ कुणी कुणाशी बोलले नाही. तेव्हा त्यानेच विषय चाळवला–

" काय ग. "

" हूं. " स्वप्नातल्यासारखी ती हुंकारली.

" आज बाजाराचा कसा बेत केलास ? "

" सज रं "

" छॅः छॅः सज कसा ? एव्हरे लांब सज कोन येईल ?"

" आलू आपली."

" आयेनं पाठवली वाटतं ? "

" हं. "

" काय खास–"

" एक पातल घेवाचा हाय. "

" बस्स् ?"

" तसा म्होप हाय रं. पोलकला कापर, बांगड्या, कुकवाची डबी, मासली काटा न जमल्यास एक जाली घेवाची हाय कंबोडला ...... तुला ?"

" छॅः तू बोलवलास म्हंगून आलू. गेले बाजारीच हवा नको त्या म्हेला. आता काय ?"

मग बोलता बोलताच मकान मागे पडला. पोयवाड आला. पाराखालचा फूल भरलेला बाजार जत्रेसारखा दिसू लागला. सुक्या बोंबील सुकटीचा वास नाक फुरफुरवू लागला. दोघंही बाजारात शिरली.

" काय घेबया. "

" चोख कांदंची माल बघ कशी देतयेती. "

" चल्. "

तो झपाझप कांद्याच्या रांगेत शिरला. लग्नाच्या बायकोगत ती पण खालच्या मुंढीनी त्याच्या मागून गेली.

" काय दिलातव येनीचा ?"

" तीन रुपये. " कांदेवाला बोलला. त्याने स्वतःशीच विचार केला.

" काय सांगताय—"

" तीन रुपये. "

" आरं बाब्बा ऽ"

" याबक्, मी बोलू काय ?"

" बोला बोला. "

" राग नायनं येवाचा ? "

" छॅः छॅः आवो धंदवाल्याला राग कसला. "

" अडीच रुपये देव. "

" उचला !"

कांद्यांची माळ पिशवीत टाकून ती दोघं पुढं झाली. बोंबील, सुकट, सकाळच्या पारी पोरांना भाकरीवर खारुक खारुक म्हंगून खार लावलेला सुका हालवा. हवं नको

ते खरेदी करून पेठेत आली. प्रत्येक वस्तूचा तो भाव ठरवीत होता आणि त्याच्या खांद्याला खांदा लावून उभे राहताना तिला वाटत होते ...... आपण नवऱ्या-बरोबरच मिरगाचा बाजार करायला आलो आहोत...... नवऱ्याबरोबर ...... क्षण-भर त्या रेश्मी स्वप्नात ती हरवली. स्वतःला संपूर्णतय: विसरून गेली ...... पातळ घेताना तिला वाटले ...... माझ्या पोराला शाळेचा गणवेषही घ्यावा.

–" आईकलाव काय ?"

" बोल."

" पोराचा खमीस फाटलाय माझ्ये. मोरका मास्तर रोज वराडतं त्याला."

" मंग ?"

" इथा वारभर कपरा."

" नको नको, पुरचे बाजारला झेव."

" कार्य नको. आयच ...... आयच तुमी, पोऱ्या माझ्या एके खमीसाशी दिस ढकालतय, झडचा मास्तरच्या शिव्या आईकतं तुमचा आपला ......"

" च्ये मारी त्या मास्तरचे तं. चल इये."

हिरवा पातळ त्याने तिच्या हातात दिला, तिने थर्रकन अंग उडवले ......इक स्वप्न इथेच संपले होते.

" आता काय ?"

" आता ?"

ती गांगरलीच, सांगावं का ...... हो हो सांगावंच, सांगावंच ......

" कुकवाची डबी."

" आनी ?"

" आनी हिरवा चुडा—"

" चुडा––?"

" हं " ती पुटपुटली, न् अवाक् होऊन तो तिच्याकडे पाहात सुटला,

" बघतस काय ?"

" अं .. अं... काय नाय. चल."

दोघही तळ्यावरल्या कासाराच्या दुकानाकडं आली. गर्द हिरव्या पाण्यासारखा चुडा कागदात बांधताना कासारीण जरा गालातच हसली. कुकवाची डबी देताना जाणूनबुजून तिने त्याच्याकडं पाहिलं ......

आणि मग खरेदी संपवून दोघंही आग्रवाल भवनमधे शिरली.

" काय खानार ?"

" तू खा बावा. मना ......"

" नाय नाय दोन शेवबुंदी हाना—"

अंतानी तेथेच बसून शेवबुंदी खाल्ली, तिने ती कागदात बांधून घेतली, गरम गरम

चहा पिऊन दोघंही बाहेर आली. बिलाचे पैसे द्यायला तो पुढे झाला. तेव्हा "मी देते." म्हणून तिने उगीचच आग्रह धरला. तेव्हा गालातल्या गालात हसत तो कुजबुजला.

"अग तू दिलेस काय नि मी दिले काय सारखंच!"

पाणावलेल्या डोळ्यांनी तिने त्याच्याकडे पाहिले.

"चल जाव या आता."

"हा ऽ ...... आता वाईच बरा वाटला. चल."

दोघंही रस्त्याला लागली. सांज झाली होती, उन्हाची वलखली ओसरली होती. मधूनच कुठून तरी वाऱ्याची गार झुळूक येत होती. अंगावर शहारे उठवून निघून जात होती. श्रीगावची नदी ओलंडली. तरी दोघंही मुकीच होती. मोठ्यानेच पाऊलं उचलीत होती.

आणि मग मेथीचा माळ आला. तो उतरता – उतरता गाव दिसू लागला. गुंजे-पलीकडली घरंही स्पष्ट ओळखता येऊ लागली. माळाच्या उतारावर ती दोघही थांबली.

"अंता."

"काय?"

"जरा मांडवात बसूं ये वाईच."

"अग कातर येळ झाली. घरी वाट बघतीन तुझी."

"बघूदे. आजचा दिस. फकस्त आजच .."

तिचं बोलणं त्याला कोडयातल्या सारखं वाटलं. तो काही विचारणार होता. इतक्यातच ती पाठ फिरवूत मांडवात आली...

"बस अंता."

डोक्यावरील घोंगडी तिने जमिनीवर अंथरली. कावराबावरा होऊन तो तिच्याकडे पाहात राहिला.

"अंता! आरं बस तरी?"

ती बसता बसताच बोलली; आणि भारवल्यासारखा टकमक टकमक तिच्याकडे पाहात तो मांडवातच तिच्या बाजूला बसला... तिचं चलन जरा वेगळंच दिसलं त्याला...

एकवार पाणभरू डोळ्यांच्या ओंजळीत तिने त्याला लपवलं. आणि पापण्या पाडून पिशवीत हात घातला. हिरवा चुडान् कुकवाची डबी हातात आली.

"अंता."

"अं."

"हा हिरवा चुडा तुझ्या हातानी ह्या हातात चऱ्हव."

"म्हंजे?"

" समदा समजलं. आधी चन्हव तरी."

न बोलता त्याने त्या हिरव्या बांगड्या तिच्या मऊसूत हातात घातल्या. गोऱ्या हातात हिरव्या बांगड्या अधिकच खुलल्या. त्याला वाटलं हा हात हातात घ्यावा. छातीशी कवटाळावा. गच्च घरून ठेवावा, आणि...

" अंता."

" काय ?"

" ध्ये कुकू ध्ये."

" कुकू ?"

" हं, तुझे हातानी हा कुकू माझ्ये भाळी लागू दे. मना – धन्य व्हवं देरं अंता..."

ती त्याच्या मिठीत शिरली. त्याच्या नजरे समोरचं कोडं अधिकच गुतलं होतं. त्याने उजव्या हाताचं मधलं बोट कुकवाच्या रक्तचंदनी डबीत बुडवलं. सुगंधाची एक झुळूक नाकात शिरली. तिच्या कपाळी त्याच्या हातून कुमकुम टिळा चढविला गेला .

पापण्या पाडून बसलेली ती अधिकच त्याला बिलगली.

" अंता... "

" अं."

" आज डोळं भरून मना बघू देरं तुला !"

" अगं, रोजच तूं बघतस !"

" ... हं. रोजच बघते. रोजच. पण कसं सांगू रे अंता, कसं सांगू .. काय वाटेल तुला, कधीकाळी एकमेकांवर आपण जीवापाड प्रेम केलं .. आयुष्यातला प्रत्येक क्षण एकमेकांच्या ध्यासात घालवला. सांज-सकाळ, वेळी-अवेळी ह्याच मांडवात एकमेकांच्या चोरून गाठीभेटी घेतल्या. खूप हसलो, खूप खिदळलो. अन् वेळप्रसंगी एकमेकांच्या मिठीत रडलोही... एक प्रीतीची कहाणी फरफटत फरफटत येथपर्यंत आली. वाटलं होतं आयुष्याच्या अंतापर्यंत ती अशीच पुढे पुढे सरकत राहील .. मग आपलं लग्न होईल तू राजा, मी राणी... पण... पण कसं सांगू तुला माझ्या जीवा. त्या प्रेम कहाणीचा आयुष्याच्या नेमक्या चढणीवरच शेवट झाला... आज होणार आहे... एक कहानी संपणार आहे."

" अंता."

" अं."

" मना मिठीत ध्ये रं ––"

" आज नको; काळोख पडला. उद्या याच जागी."

" पन् अंता .. अंता उद्या मी परक्याची व्हईन..."

" चंद्राऽ"

" उद्या मी परक्याचे नावानं चुडा भरीन, परक्याचा कुकू कपाळी लावीन. हा

चुडा आता थोरेच घटकेने फुटला जाईल. माझ्ये डोल्यादेखत तुझी चिता पेटल. आन् मंग माझा दुसरा लगन व्हईल. अंता .. अंता मी परक्याची व्हईन... राजा माझा एक सपान व्हतं. तुझ्येच नावानी हिरवा चुडा भराचं आऊष्कभर तुझ्येच नावानी कपाली कुकू लावाचं . पन् राजा... राजा ह्योच सपान मी घट्कं पुरता पुरा केलाय. तुझ्ये नावानी चुडा भरलाय. तुझ्येच नावाचा कुकू कपाळी लावलाय... आऊष्कात आता ह्याच समाधानावर मला जगू दे .. कधी काळी अंता नावाचा माझा नवरा व्हता .. कधी काळी त्याचे नावाचा मी चुडा भरला होता ये अंता .. एक सपान बाकी ऱ्हालाय... ह्या देहाचे सुख सौख्याचा... झ्ये मना मिठीत झ्ये .."

"चंद्रा ऽ ..."

ती खूप बोलली. बरंच काहीसं बोलली. आणि मांडवाच्या कुडगीवर तो डोकं आपटू लागला... स्फुंदून स्फुंदून रडू लागला... कधी काळी रडायचा तो तिच्या कुशीत... ती आसवं पुसायची ती आपल्या पदरानी पण आज... दुभंगलेल्या आवाजात तो करुणा भाकत होता... हे असं कसं झालं ग चंद्रा... असं कसं झालं.

हळूच ती त्याच्या जवळ सरकली. शरीरसौख्याचं एक स्वप्न अजून अपुरंच राहिलं होतं

"अंता, ये जवळ ये .. फकस्त आजच— आजचा रोज—"

डबडबलेल्या डोळ्यांनी त्यांनी तिच्याकडे पाहिले. दोन्ही बाहू पसरून ती त्याची प्रतीक्षा करीत होती. त्याला विनवीत होती ये अंता, येरे . आज आपल्या लग्नाची पहिली रात्र आहे ये अंता येरे ..मज जवळ घे ..जवळ ..

हळूच तो पुढे सरकला. ती थर्‌रली खालची मान वर न करताच उभी राहिली. आपल्या थरथरत्या हातानी भुईकडं झुकलेली तिची मान त्याने वर उचलली. तळव्यातल्या कमळागत ओंजळीत धरली ..

"चंद्रा, अग येडीच हायस तू .."

"येडी, खुळी आपलूं तरी तुझी हाय, तुझ्ये नावानी चुडा भरलेली. कपाळी कुकू लावलेली. जन्म जन्माची अर्धांगी नसलूं तरी घट्कची धरम पत्नी समान... न् मना मिठीत झ्ये रं."

"नको, नको चंद्रा .. नको नको .."

"का .. का नको? मी का पराई बाईल हाय?"

"माझ्येसाठी तू पराईच हाईस आता—"

"अंता ऽ ... मंग ह्यो चुडा कसला? ह्यो कुकू कसला?"

"सपनांचा .. तो एक सपान हाय चंद्रा .. घट्क पुरता सपान."

"मंग ह्या सपनात तरी तू; माझ्या या देहावर अधिकार गाजव. नवरा म्हणून."

"येडे त्या पाप व्हईल... पाप... ह्या पापाला मना बळी पाडू नको गं चंद्रा ऽ"

"पाप पुन्य मी जानीत नाय. मी एव्हराच जानतय तू माझा नवरा हाईस. तुझ्येच नावानी मी चुडा भरलाय. तुझ्यच नावाचा कुकू कपाली लावलाय. आता ह्या देहावर अधिकार तुझा..."

"चंद्रा ऽ ... येडे ह्या देहावर अधिकार त्येचा; जो देवा बामना समक्ष शपाथ घेऊन फुलांची माळ गळयात टाकतं त्याचा... तो अधिकार मी कसा घेवू... कसा घेवू कसा...

खस्कन् त्याने तिच्या कपाळाचं कुकू पुसून टाकलं. थरथरत्या हाताच्या दणकट मुठीत नुक्ताच भरलेला हिरवा चुडा फोडून टाकला. कच्कन्...

"जा... जा... आज पासन्या मी खपलू. तुझ्येसाठी मेलू; कायमचा..."

मान टाकून तिने दुभंगलेल्या आवाजात हंबरडा फोडला... "अंता ऽऽऽऽ"

डोक्यावरल्या पेंढयाच्या मांडवाने आडवून ठवलेला तो हंबरडा पुनः पुन्हा काळोखात घुमू लागला,

अंता ऽऽऽऽ ...

## भारतातील खासगी उद्योगधंदे

"अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ इंडियन स्टडीज्" या भारतविषयक अध्यापन संस्थेचे एक तज्ज्ञ डॉ. स्टॅन्ले कोकानेक काही दिवसांपूर्वी भारतातील खासगी उद्योगधंद्यांचे निरीक्षण करण्यासाठी हिंदुस्थानात येऊन गेले तेव्हा म्हणाले, "भारताच्या अर्थकारणात खासगी उद्योग-व्यवसायाला फार महत्त्वाचे स्थान आहे, पण पाश्चिमात्य मंडळींना या उद्योग-व्यवसायाबद्दल फारच थोडी माहिती आहे. उलट सरकारी क्षेत्रातील व्यवसायाचे उत्पन्न खासगी उद्योग-धंद्यांपेक्षा बरेच कमी असूनही त्याच्याबद्दल बरेच लिहिले गेले आहे." अमेरिकेतील लोकांना भारतीय खासगी उद्योग-धंद्याची ओळख करून देणे आणि या उद्योग-धंद्याचे भारतात काय स्थान आहे याचे अध्ययन करण्याची आवश्यकता आहे. येथील खासगी उद्योग-धंद्यांची रचना कशी असते, ते आपले धोरण कसे ठरवितात, त्याची माहिती लोकांना कशी करून देतात आणि त्यांच्या प्रभावामुळे सरकारी धोरण कसे व किती बदलते याचे अध्ययन झाले पाहिजे. सरकार व उद्योग-धंदे या दोघांचेही उद्दिष्ट उत्पादन वाढविणे हे असले तरी त्यांच्या कार्यपद्धतीत स्वाभाविकच तफावत असते. उद्योग-धंद्यांच्यापुढे काय समस्या आहेत व त्या सोडविण्यासाठी त्यांनी केलेल्या सूचना सरकारने अमलात आणण्याच्या मार्गात काय अडचणी असतात, याचा तौलनिक अभ्यास झाला तर या दोन्ही मंडळींत अधिक सामंजस्य नांदू शकेल.

# पुस्तके

## निशिकांत मिरजकर

आरंभकाळापासून इ. स. १८१८ पर्यंतच्या काळातील आरत्यांची विचिकित्सा करणारा 'मराठी आरती' हा डॉ. म. वि. गोखले यांचा पी. एच्‌डी. चा प्रबंध नुकताच प्रसिद्ध झाला. 'आरती' ही जनसंमर्दात अत्यंत लोकप्रिय आणि आबाल-वृद्धांना परिचित अशी एक पद्यरचना आहे. हे पद्य आकाराने अगदी लहान असते. त्यात गेयतेला प्राधान्य असते. ती पूजेच्या शेवटी म्हणतात. साधकाच्या भावना अर्थातच त्या वेळी उत्कट झालेल्या असतात. सर्वांनी मिळून एकसुरात टाळचांच्या साथीवर आरतीचा गजर केला म्हणजे भावना भारावून जातात. मन हेलावते. भक्ताची आर्तता शिगेला पोचते !! "भारतीय संस्कृतीत पूज्य पूजक-संबंधाला-फार मोठ स्थान आहे. म्हणूनच आरतीसारखी रचना इतकी महत्त्व पावली व लोकप्रिय ठरली." तथापि मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात तो प्रांत आजपर्यंत दुर्लक्षित राहिला आहे. अभंग, ओव्या, पदे वगैरे प्राचीन पद्यप्रकारांनी मराठी वाङ्मयाच्या दरबारात ज्या तोडीचे स्थान मिळविले तसे स्थान 'आरती' या पद्यप्रकाराने मिळविले नव्हते. डॉ. गोखले यांनी 'आरती' या वाङ्मयप्रकाराचा अभ्यास करून, त्यावर प्रबंध लिहून या पद्यरचनेचे दालन वाङ्मयीन चिकित्सेच्या प्रकाशात आणले आहे. अनेक दुर्मिळ आरत्या गोळा करून त्याची सर्वांगीण चिकित्सा त्यांनी केलेली आहे. आरती-तील तत्त्वज्ञान, नीतिविवेचन, भक्तिमार्ग आणि त्याची काव्यशास्त्रीय चिकित्सा अशा चार दृष्टिकोनांतून त्यांनी आरत्यांचा अभ्यास केलेला आहे.

वास्तविक आरती हा स्फुट पद्याचा अगदी टोकाचा प्रकार. अर्थातच तत्त्वज्ञान, नीती, भक्तिमार्ग वगैरेंचे पूर्ण विवेचन अथवा चर्चा होण्यास त्यामध्ये अवकाश नाही. येऊन जाऊन आढळतात ते केवळ स्फुट उल्लेख तथापि आरती लिहिणारे कवी त्याच वातावरणात मुरलेले असल्यामुळे हे उल्लेख म्हणजे मुद्दाम केलेली प्रवचने नसली तरी त्यांच्या तत्त्वचिंतक, नीतिज्ञ, भक्तिमय अशा व्यक्तिमत्त्वाचे ते कवडसे आहेत. त्यामुळे त्यातून आरतीकारांच्या तत्त्वज्ञानाची, नीतिविवेचनाची, भक्ति-मार्गाची सुसंगतवार चौकट उभी करणे डॉ. गोखले यांना शक्य झाले आहे.

# ‘ जुन्या साहित्यातील एक दुर्लक्षित दालन ’

अर्थात या विवेचनात मूलगामी चर्चा आढळत नाही. तत्त्वज्ञानाचा, भक्तिमार्गाचा मुळापासून विचार अथवा ऊहापोह त्यात केलेला नाही. कारण डॉ. गोखले यांचे क्षेत्र ते नाही. तत्त्वपर शब्दांनी तत्त्वज्ञानाच्या नुसत्याच रेखाकृती काढल्यामुळे त्याचे वर्णन काहीसे सपक वाटते. ते जास्त मूलगामी रीतीने करावयास हवे होते असे सारखे वाटत राहते. मात्र एका व्यासंगी अभ्यासकाला आरतीतील आशयाच्या अभिव्यक्तिविषयी काय वाटते ते डॉ. गोखल्यांनी चांगले स्पष्ट केले आहे. त्यांचे त्याबद्दलचे विवेचन त्यांच्या अभ्यासाची आणि परिश्रमाची साक्ष पटविते.

काही किरकोळ मतभेदांची स्थाने :–

१. नीति–विवेचनात नीती आणि परमार्थसाधना यांचा गोंधळ झालेला आहे.

> “ प्रपंचरचना सर्वहि भोगुनी त्यागिली ।
> अनुतापाचे ज्वाळी देहबुद्धी हरवली ।।
> वैराग्याची निष्ठा प्रगटुनि दाखविली ।
> अहंममता दवडुनि निजशांती वरिली ।। ”

अशा तऱ्हेने केलेल्या तुकोबांच्या चरित्राच्या वर्णनात “ निळोबा त्यांच्या चरित्रातील नीतिमयतेला केवढे महत्त्व देतो ते ” पाहण्यासारखे आहे असे डॉ. गोखले म्हणतात. पण खरे म्हणजे ते परमार्थमार्गाचेच वर्णन असल्याचे प्रथम जाणवते. तुकोबांनी अहंता, ममता इत्यादींचा केलेला त्याग यांसारख्या गोष्टी म्हणजे नीतिविवेचन नाही. नीति-विवेचनासाठी निराळे प्रकरण करण्यापेक्षा “ आरतीतील भक्तिमार्ग ” या प्रकरणाचाच एक उपविभाग म्हणून नीतिमार्ग समाविष्ट होऊ शकला असता.

२. “ स्तोत्रात दैवताची स्तुती करताना मूर्ती, चरित्र यांना आरतीप्रमाणेच स्थान मिळाले असले तरी मनातले आर्त भक्ताच्या भावनेने आपल्याला दैवतापर्यंत पोचविण्याचे कार्य आरतीमध्ये प्रधान मानलेले असते. तसे स्तोत्रात नसते. ” असा फरक

आरती व स्तोत्र यांमध्ये डॉ. गोखले सांगतात. पण हे पटत नाही. स्तोत्रातही मना॰ तले आर्त सांगण्याचे काम प्रधान मानलेले असते. रामदासांची करुणाष्टके, एक-नाथांची काही पदे यांची येथे सहज आठवण व्हावी.

३. " अनेकत्वात एकत्व पाहण्याच्या या प्रयत्नात समोरील दैवत हे साधनभूत होते आणि परमतत्त्वाचा विचार हेच साध्य ठरते. मग कित्येक भक्त आपल्या दैवताची थोरवी गाताना तत्त्वज्ञानाची परिभाषा वापरू लागतात," असे गोखले म्हणतात.

वस्तुस्थिती याच्या उलट आहे असे मला वाटते. दैवत हे साधन कधीच होऊ शकत नाही. मग ती आरतीच उरणार नाही. दैवत हेच आरतीचे साध्य असते. आणि त्याचा महिमा वर्णन करताना तत्त्वज्ञानविषयक विचार हेच साधन ठरून कवी तत्त्वज्ञानाची परिभाषा वापरतो.

४. " आरंभापासून येथपर्यंत होऊन गेलेल्या कवींनी आरतीची रचना केली आणि तिला वाङ्मयाच्या क्षेत्रात मानाचे स्थान मिळवून दिले." (पृष्ठ १२), असे म्हणून ख्रिस्ती धर्माचारातील 'Incense' आणि आपल्याकडील 'आरती' यांचे साम्य दाखविणारा फादर स्टीफन्सच्या ओव्यांचा उल्लेख डॉ. गोखले यांनी केला आहे. परंतु हे बरोबर नाही.

भारतातील आरतीला मराठी वाङ्मयात मानाचे स्थान मिळालेले नाही. फादर स्टीफन्सच्या अवतरणातील आरती हा शब्द मराठी वाङ्मयातील तिच्या स्थानाला अनुलक्षून वापरलेला नसून भारतीय 'पूजोपचाराच्या' साम्यावरून त्याला सुचला आहे.

५. ज्ञानेश्वरांचा " मूळचे नाथपंथीय पण कार्यक्षेत्रदृष्टचा वारकरी पंथाचे अध्वर्यू म्हणून ओळखले जाणारे ज्ञानेश्वर " असा उल्लेख पृष्ठ ११ वर डॉ. गोखले करतात.

वास्तविक नाथपंथ आणि वारकरीपंथ यांची तात्त्विक बैठक आणि कार्यक्षेत्राची कक्षा ही पूर्णपणे वेगळ्या पातळीवरील आहेत. वारकरी पंथ हा सर्वसमावेशक असा एक 'उपासना मार्ग' आहे. त्यामध्ये नाथपंथीय आहेत, तसेच इतरही पंथांचे लोक आहेत. त्यामुळे त्या दोन्हींची समपातळीवर तुलना होऊ शकत नाही.

६. " नाथांनी आरतीची रचना बुद्धिपुरस्सर केलेली दिसते." (पृ. १३) असे डॉ. गोखले म्हणतात. अनंत वाङ्मयप्रकारांची निर्मिती करणाऱ्या नाथांनी खास आरतीची रचना बुद्धिपुरस्सर केली असे म्हणणेच पटत नाही. नाथांच्या लेखणीने जसा अनेक पद्यप्रकारांना स्पर्श केला, तद्वतच 'आरती' हा पद्यप्रकारही त्यांच्या लेखणीने हाताळावा हे शक्य आहे. त्यात कोठे बुद्धिपुरस्सरता असेल असे वाटत नाही.

७. अगदी साध्या उल्लेखावरून कधी कधी फार मोठी अनुमाने डॉ. गोखले एक-दम काढतात. उदाहरणार्थ " तुकारामांच्या भावनावशतेचा निर्देश करण्यास त्यांच्या

अनेक आरत्यांत 'माझ्या पंढरीनाथा' असा विठ्ठलाचा येणारा उल्लेख पुरेसा आहे." असे त्यांनी म्हटले आहे. 'माझ्या पंढरीनाथा' हे शब्द कुणीही उच्चारावेत असे सामान्यच आहेत. त्यांच्यामागे खास काही भावनावशता वगैरे नाही.

८. काही काही विधानेही जरा खटकतात. उदाहरणार्थ—

१. "भक्तकवी भक्तिमार्गाशी परिचित होते." (पृष्ठ १११)

-भक्तकवी हे भक्तिमार्गाची वाटचाल केल्यामुळेच भक्तकवी झाले. अर्थातच साधकावस्थेशी, भक्तिसाधनेच्या मार्गाशी त्यांचा परिचय हा होतोच.

२. "विष्णु कवी शिवाच्या आरतीत आत्मक्लेशांची नोंद पुढीलप्रमाणे करतो." (पृष्ठ १२२)

भक्ताला क्लेश होतात ते त्याच्या मनीचे आर्त असते, हृद्गत असते. अर्थातच त्याच्या वाणीतून ते जिव्हाळ्याचा रसरशीतपणा घेऊन उत्स्फुरतेच. त्याची काही 'नोंद' ठेवावी लागत नाही. किंबहुना त्या संदर्भात 'नोंद' हा शब्दप्रयोग बसूच शकत नाही.

३. "साधकदशेतील अंतिम अवस्था म्हणजे आत्मिक रात्र" (पृष्ठ ६११) हेही बरोबर नाही. साक्षात्कार झाला म्हणजे मग साधकदशा संपते. म्हणजे आत्मिक रात्रीनंतर होणारा साक्षात्कार ही साधकदशेतील अंतिम अवस्था.

असो. या काही उणिवा. पण इ. स. १८१८ पर्यंतच्या सर्व आरत्या गोळा करून आणि अनेक दुर्मिळ आरत्या मोठ्या परिश्रमांनी मिळवून त्यांचे अभ्यासपूर्वक विश्लेषण आणि त्यावरील विचिकित्सा करण्याची मोठीच कामगिरी डॉ. गोखले यांनी केली आहे, हे महत्त्वाचे आहे. आरतीचा वाङ्मयीन विचार करताना तर शब्दाच्या मर्यादा आरतीकारांना कधीच जाणवल्या नाहीत हे डॉ. गोखल्यांनी चांगले दाखविले आहे. आरती या मराठी वाङ्मयातील उपेक्षित प्रांताची दखल घेऊन त्यांनी मराठी सारस्वताची कक्षा यशस्वीपणे विस्तारली आहे याची जाणीव हा ग्रंथ वाचल्यावर होईल. ग्रंथाच्या शेवटच्या भागात सर्व आरत्या एकत्रित देऊन त्यांची सूची, विषयसूची आणि संदर्भग्रंथसूची देऊन हा ग्रंथ सुसंश्लेषित आणि परिपूर्ण बनविला आहे. ○

('मराठी आरती' – डॉ. म. वि. गोखले,
सावित्री प्रकाशन, किंमत रु.१५, पृष्ठे – ४६४)

## यशवंत जोशी

'दूरचित्रवाणीची (Television) भारतात आवश्यकता' या विषयावर नव्या दिल्लीमध्ये या वर्षीच्या सुरुवातीला एक परिसंवाद झाला. 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मास कम्युनिकेशन' तर्फे हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. परिसंवादात एकूण नऊ निबंध वाचण्यात आले. परदेशांतील तज्ज्ञांनाही परिसंवादात भाग घेण्याकरिता बोलविण्यात आले होते. नऊपैकी पाच निबंध परदेशी पाहुण्यांचे होते.

परिसंवादाच्या शिफारशी स्थानिक वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. काही वृत्तपत्रांनी अग्रलेख लिहूनही परिसंवादाचं स्वागत केलं आहे. या परिसंवादात काही मूलभूत प्रश्न निर्माण करण्यात आले. त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्नही निबंधाद्वारे करण्यात आला. त्याची थोडीफार कल्पना मराठी जनतेला व्हावी म्हणून हा प्रयत्न आहे.

आज जगातील देशांचे विकसित आणि विकसनशील असे दोन गट पडतात. पैकी भारत हा विकसनशील गटात मोडतो. देशातील सामान्यातील सामान्य माणसाच्या अन्न, वस्त्र, निवारा, औषधपाणी आणि शिक्षण ह्या प्रमुख पाच अत्यावश्यक गरजा भागाव्यात म्हणून प्रत्येक देशातील सरकारे आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत. भारत स्वतंत्र होऊन वीस वर्षे झाली. अत्यावश्यक अशा ह्या पाच गरजांपैकी किती गरजा आपण आजवर पूर्ण करू शकलो आहोत ? याचं उत्तर सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आहे. ते निराळं देण्याची गरज नाही. आपला विकास झाला आहे, होत आहे. परंतु तो अद्याप डोळ्यात भरत नाही. असे असताना दूरचित्रवाणीसारख्या महागड्या आणि सकृद्दर्शनी चैनीसारख्या दिसणाऱ्या जनतासंपर्क माध्यमाचा (Media of Mass Communication) आपण अवलंब करावा का ? सामान्य माणूस आणि पक्षोपपक्षांतील मंडळींचा दूरचित्रवाणीला प्रामख्यानं विरोध आहे तो ह्या कारणामुळं ! 'प्रथम पोट नंतर सर्व काही' असं त्यांचं म्हणणं आहे.

हा युक्तिवाद सकृद्दर्शनी बिनतोड वाटतो आणि 'दूरचित्रवाणी नको' असा आवाज उठविला जातो. परंतु क्षणभर शांतपणे विचार करून एका प्रश्नाचं उत्तर

# आम्हाला दूरचित्रवाणी पाहिजे

आपण प्रथम शोधायला हवं. तो प्रश्न असा की 'दूरचित्रवाणी ही गरज आहे की चैनीची वस्तू आहे?' (Television : Luxury or Necessity ?)

अणू सर्वांना माहीत आहे. अणूपासून अणुशक्ती निर्माण करून देशाचा विकास साधता येतो त्याचप्रमाणे अण्वस्त्रे निर्माण करून देशच्या देश बेचिराख करून टाकता येतात. अणू जसा तुम्ही वापराल त्याप्रमाणं त्याचं फळ तुम्हांला मिळेल. तीच गोष्ट दूरचित्रवाणीचीसुद्धा आहे. केवळ करमणूक म्हणून तुम्ही दूरचित्रवाणीकडं पाहात असाल तर ती चैनीची वस्तू ठरेल. आणि भारतास तूर्त तरी असली चैन मंजूर नाही. मूठभर धनिकांच्या ऐषआरामी करमणुकीसाठी जर दूरचित्रवाणी असेल तर कुणीही सामान्य माणूस अथवा राजकीय पक्ष ती चालू देणार नाही. आम्ही सामान्य माणसं दूरचित्रवाणीकडं पाहतो ती केवळ याच एका संकुचित दृष्टिकोनातून. परंतु 'दूरचित्रवाणी'ची दुसरी एक बाजू आपण अद्याप लक्षातच घेतलेली नाही. आकाशवाणीचे सर संचालक डॉ. नारायण मेनन यांनी आपल्या भाषणात या दुसऱ्या बाजूचा उत्तम परामर्श घेतला.

वृत्तपत्रे (Press), आकाशवाणी (Radio), चित्रपट (Films & Audio-Visuals), जाहिराती (Advertising) इत्यादी 'जनतासंपर्का'ची माध्यमे आहेत. त्याचप्रमाणं दूरचित्रवाणी (Television) हे सुद्धा एक प्रभावी माध्यम आहे. वृत्तपत्रांतील वृत्त, आकाशवाणीतील ध्वनी, चित्रपटांतील प्रकाश आणि जाहिरातींतील कलात्मक सौंदर्याचा भाग ह्या सर्वांचा सुरेख संगम दूरचित्रवाणीत झालेला आहे. रेडिओ ज्याप्रमाणं कुणालाही घरबसल्या एकता येतो त्याप्रमाणं टेलिव्हिजन कुणालाही घरबसल्या पाहता येतो. जनतासंपर्क माध्यमातील दूरचित्र-वाणीचा हा विशेष कुणालाही नाकारता येणार नाही. डोळे आणि कान या दोन्ही ज्ञानेंद्रियांद्वारे होणारा परिणाम हा अधिक प्रभावी व आकर्षक असतो हे विसरता येणार नाही. तेव्हा अशा या प्रभावी माध्यमाचा भारतातील निरक्षरता दूर करण्या-साठी, शाळा–प्रशालांतून शिक्षण देण्यासाठी, शेतीच्या अद्ययावत विकासाची माहिती

पुरविण्यासाठी, कुटुंब–नियोजनाची आवश्यकता पटविण्यासाठी, भाषिक दुरावा दूर करण्यासाठी, प्रांताप्रांतातील संस्कृती व कला अधिकाधिक जवळ आणण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी उपयोग करता येणार नाही का ? भारतात निरक्षरता खूप आहे. लिहिता वाचता न येणाऱ्या ह्या लोकांना 'दूरचित्रवाणी' पाहून ज्ञान प्राप्त करून घेता येईल. आमच्या विकासाच्या प्रयत्नांत दूरचित्रवाणी साहाय्यभूत ठरणार आहे, ती जनतासंपर्काचं एक प्रभावी माध्यम म्हणून. इतर विकसनशील देशांत तशी ती प्रभावी ठरली आहे.

भारताची विविधता आणि विशालता लक्षात घेता, सध्या वापरात असलेली जनतासंपर्काची माध्यमे ही कितीतरी अपुरी आहेत. विसाव्या शतकात माहिती आणि जनतासंपर्क (Mass Communication) ह्याचे महत्त्व लक्षात न घेता आपण परंपरागत कल्पनांना चिकटून राहिलो तर शेती, पाटबंधारे, उद्योगधंदे, वैद्यकीय, शास्त्रीय व वैज्ञानिक ज्ञान इत्यादी क्षेत्रांत आपण विकास करू शकू का ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

१९५१ ते १९६१ ह्या दहा वर्षांच्या काळात साक्षरतेचं प्रमाण अवघं ११·७ टक्क्यांनं वाढलं. भारत हा शेतीप्रधान देश असूनही आज आमच्या जमिनीतून येणारा पिकाचा उतारा हा जगात सर्वांत कमी आहे. दर श्वासागणिक अनेक नवे जीव जन्माला येऊन लोकसंख्यावाढीचा ब्रह्मराक्षस फुगत चालला आहे आणि स्वातंत्र्य मिळून वीस वर्षे झाली तरी आमचे मूलभूत प्रश्नही अजून सुटले नाहीत. या सर्वांचं कारण काय ? 'याला जबाबदार सरकार' एवढं म्हणून काही मंडळी हात झटकून मोकळी होतात. परंतु याच मुख्य कारण म्हणजे त्या त्या क्षेत्रांतील अद्ययावत माहिती अथवा ज्ञान त्या त्या व्यक्तीपर्यंत पोहोचत नाही. त्यासाठी असणारी संपर्क माध्यमे (Mass Media) ही अपुरी पडतात. म्हणूनच काही तज्ज्ञांचं म्हणणं असं आहे की दूरचित्रवाणी भारतात पहिल्या अगर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू करण्यात आली असती तर गेली दोन–तीन वर्षे आपणाला धान्यटंचाईच्या संकटाला जे तोंड द्यावं लागलं त्याची तीव्रता कमी झाली असती.

दूरचित्रवाणीचा हा विधायक भाग सामान्य माणसाच्या बुद्धीला चटकन पटत नाही. कारण ज्या परंपरेत तो वाढला आहे, ती परंपरा फाजील चिकित्सकाची आहे, थोडीशी होरपळलेली आहे, पोळलेली आहे. त्यामुळं कुठलीही नवीन गोष्ट स्वीकारताना ती नेहमी मागेपुढे पाहते.

## पोलंड, माल्टा आणि दिल्ली

परंतु प्रो. डोब्रोझिन्स्की (Prof. Dobrozynski) आणि डॉ. पी. आर्. व्ही. डीड ह्या दोन परदेशी पाहुण्यांनी जे निबंध परिसंवादात वाचले त्यांवरून अनुक्रमे

पोलंड व माल्टामध्ये दूरचित्रवाणी कशी प्रभावी ठरली आहे याची कल्पना येते.

प्रो. डोब्रोझिन्स्की आपल्या निबंधात म्हणतात: ' माझ्या देशात माहिती, प्रसार, प्रतिष्ठा, शिक्षण आणि करमणूक हे पाच दूरचित्रवाणीचे उपयोग आहेत. पोलंड-मधील ५० टक्के कुटुंबांत दूरचित्रवाणी असून तेथील ९० टक्के जनता दूरचित्र-वाणीचे कार्यक्रम पाहते. पोलंडमध्ये आता एकही माणूस निरक्षर राहिलेला नाही. दूरचित्रवाणीने पोलंडमध्ये जागरूकता (awareness) निर्माण केली. दूरचित्र-वाणीवरील बातम्या व कार्यक्रम ह्यांनी हे कार्य केलं. पोलिश बालकांना जबाबदार नागरिक बनविण्याचं शिक्षण दूरचित्रवाणीद्वारा देण्यात येतं. संस्कारक्षम बालमना-वर चित्र व वाणीचा खोलवर परिणाम होतो. कुटुंब नियोजन, वैद्यकीय साहाय्य, शेतीची मशागत व सुधारणा ह्या क्षेत्रांतही पोलिश दूरचित्रवाणीने फार मोठी कामगिरी पार पाडलेली आहे.'

माल्टामध्ये दूरचित्रवाणीचा शिक्षणासाठी कसा उपयोग करण्यात येत आहे व ती किती प्रभावी ठरत आहे याची माहिती डॉ. पी. आर. व्ही. डीड यांनी दिली.

परदेशांतील ही उदाहरणे पाहून कुणी म्हणेल की हे प्रयोग भारतात यशस्वी होतीलच असं कशावरून? आणि ही शंका रास्त आहे. परंतु आपण निराश होण्याचं कारण नाही. डॉ. आर. लायल् वेब्स्टर आणि डॉ. एस्. के. शर्मा या दोन तज्ज्ञांनी भारतातच दूरचित्रवाणीच्या परिणामकारकतेसंबंधी संशोधन करून दोन निबंध परिसंवादात सादर केले. त्या दोन निबंधांचं परिशीलन केल्यास आपली ही शंका दूर होते. विस्तारभयास्तव त्या दोन निबंधांचा विस्तृत प्रमाणात उल्लेख करता येत नाही. परंतु खालील त्रोटक विवेचनावरून विषयाचे मर्म समजण्यास मदत होईल अशी आशा आहे.

आपल्या देशात नवी दिल्ली येथे १९५९ पासून दूरचित्रवाणीचे एक केंद्र चालू आहे. सध्या त्यावर रोज दोन तास कार्यक्रम दाखविले जातात. आठवड्यातून दोन दिवस ' कृषिदर्शन ' हा १० मिनिटांचा एक खास कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी असतो. १९६७ च्या २६ जानेवारीपासून तो सुरू करण्यात आला आहे. प्रो. डोब्रोझिन्स्की यांनी या कार्यक्रमाबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. ते म्हणतात, ' जगातील सर्व दूरचित्रवाणीवरील शेतीविषयक कार्यक्रमांत भारताचा कार्यक्रम सर्वांत उत्तम आहे. '

ह्याच कार्यक्रमावर डॉ. वेब्स्टर आणि डॉ. एस्. के. शर्मा यांनी संशोधन करून निबंध सादर केले आहेत. डॉ. वेब्स्टर म्हणतात की शैक्षणिक चित्रपटांचा परिणाम शेतकऱ्यांवर फार काळ राहात नाही, परंतु दूरचित्रवाणीचा परिणाम दीर्घकाळ राहतो. भारतात दूरचित्रवाणी म्हणजे राष्ट्रीय विकासाचं एक माध्यम ठरायला हवं. कारण ती पाहणारा ८० टक्के प्रेक्षक वर्ग हा खेड्यांतून पसरलेला आहे. दिल्ली-नजीकच्या खेड्यांतील सुमारे दीडशे शेतकऱ्यांच्या त्यांनी मुलाखती घेतल्या तेव्हा त्यांना असं आढळून आलं की रेडिओवरील शेतीविषयक कार्मक्रमापेक्षा दूरचित्र-

वाणीवरील ' कृषिदर्शन हा कार्यक्रम शेतकऱ्यांना अधिक आवडतो. आणि त्याचं कारण ते असं सांगतात की ह्या कार्यक्रमांत त्यांना निरनिराळ्या प्रांतांतील शेतकरी शेती कशी करतात हे समजते.

डॉ. शर्मा यांनी पाच कार्यक्रम निवडले. ते कार्यक्रम पाहण्यापूर्वी, पाहिल्यानंतर लागलीच आणि नंतर पंधरा व तीस दिवसांच्या अंतराने शेतकऱ्यांच्या मनावर कार्यक्रमाचा परिणाम कितपत राहतो याचा आकडेवारीने अभ्यास केला. या पाहणीतून खूपच गोष्टी उजेडात आल्या. शेतकऱ्यांना असले कार्यक्रम मनापासून आवडतात. असे कार्यक्रम आठवड्यातून दोहोपेक्षा अधिक वेळा ठेवावेत, त्याचप्रमाणे त्यांची वेळ वाढवावी अशी त्यांची मागणी आहे. एकदा दाखविलेला कार्यक्रम पंधरा वीस दिवसांनी परत दाखविण्यात यावा. तसंच कार्यक्रमाद्वारं दिलेली नवी माहिती छोट्या पुस्तिकांच्या रूपानं संदर्भासाठी शेतकऱ्यांना देण्यात यावी. माहिती देणारा कृषितज्ञ पडद्यावर दाखवावा. विषय शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा असल्यानं माहिती बराच काळपर्यंत त्यांच्या स्मरणात राहते. ते ती प्रयोगानं पक्की करतात. यासंबंधी अद्यापही संशोधन चालू आहे. सारांश हा, की दूरचित्रवाणी शेतीविषयक माहिती पुरविण्यात निश्चितपणे फलदायी ठरणारी आहे.

भारताला अन्नाप्रमाणंच दुसरा भेडसावणारा प्रश्न म्हणजे लोकसंख्यावाढीचा. फोर्ड फौंडेशनचे श्री. फ्रँक वाइल्डर आणि कुटुंबनियोजन विभागाचे असि. कमिशनर श्री. त्यागी ह्या दोघांनी आपल्या संयुक्त निबंधात म्हटलं आहे की, आज देशाच्या दोन तृतीयांश गावातून दूरचित्रवाणी असती तर कुटुंबनियोजनासंबंधी जनतेत जागरूकता निर्माण करण्यासाठी इतर माध्यमांची जितकी आवश्यकता आज भासते तितकी भासली नसती.

## पैसा किती लागेल ?

भारत हा विशाल देश आहे. नाना भाषा, नाना संस्कृती येथे नांदत आहेत. या सर्वांना जवळ आणण्यासाठी दूरचित्रवाणीचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग होणार आहे. आकाशवाणीनं सरकारला सादर केलेल्या कार्यक्रमानुसार १९७० पर्यंत मुंबई, मद्रास, कलकत्ता व कानपूर या ठिकाणी दूरचित्रवाणीची केंद्रे निघतीलही. त्यामुळे या शहरांच्या ४०–४२ मैल त्रिज्येच्या परिघातील खेड्यांनाच तिचा फायदा मिळेल. राष्ट्रीय प्रगतीचे एक माध्यम म्हणून दूरचित्रवाणीचे जाळे देशभर जलद वेगाने पसरणे जरूर आहे. यासाठी लागणारा पैसा कोठून आणायचा ? तो किती लागेल ? दूरचित्रवाणीसाठी लागणारी यंत्रसामग्री आणि शास्त्रज्ञ यांचा प्रश्न कसा सोडवायचा ?

या विषयांवर परिसंवादात व्हावी तशी परिणामकारक चर्चा झाली नाही. दूरचित्रवाणीचे सेट्स स्वस्त किमतीत देशातच उपलब्ध व्हायला हवेत असा आग्रह मध्यवर्ती अर्थखात्याचे राज्यमंत्री श्री. के. सी. पंत यांनी प्रतिपादन केला. पिलानी

येथील सेन्ट्रल इलेक्ट्रॉनिक एंजिनिअरिंग इन्स्टिटयूटचे डॉ. राव यांनी पिलानी येथे तयार होणाऱ्या सेट्सची माहिती दिली व अद्यापही काही सुटे भाग परदेशांतून आयात करावे लागत असल्याने सेटस्ची किंमत कमी करता येत नाही असं सुचवलं. आय्. आय्. टी. कानपूरचे डॉ. पै यांनी इलेक्ट्रॉनिक्स् इण्डस्ट्रीची प्रगती विशद करून दूरचित्रवाणीसाठी शास्त्रज्ञांची वाण पडणार नाही असा दिलासा दिला.

आकाशवाणीचे प्रमुख एंजिनियर श्री. अय्यर व श्री. नेरूरकर ह्यांनी खर्चाचा अंदाज निवेदन करताना सांगितलं की आकडयांनी आपण भिऊन जाता कामा नये. टप्प्याटप्प्यानं भारतात दूरचित्रवाणीची वाढ होणार आहे. फोर्ड फौंडेशन, युनेस्को, पश्चिम जर्मनी या देशांचे साहाय्य या कामी आपणाला मिळत आहे. पहिल्या टप्प्यात होणाऱ्या-मुंबई ७५ लाख, मद्रास व कलकत्ता ७५ लाख, कानपूर ५० लाख व नवी दिल्ली केंद्राची क्षमता वाढविण्यासाठी आणखी १० लाख–असे सुरुवातीस एकूण २ कोटी १० लाख रुपये लागतील. त्यांनी आणखी असंही सांगितलं की ही केंद्रे तयार झाली तरच युनेस्कोच्या संकल्पित सेटेलाइट कम्युनिकेशनचा आपणास फायदा घेता येईल. अहमदाबादवर तो राहील व अहमदाबाद केंद्र त्या वेळी सुरू करण्यात येईल. पैशाचा बाऊ करून आताच हातपाय गाळण्यात अर्थ नाही.

याच संदर्भात त्यांनी अशीही माहिती दिली की पाकिस्ताननेसुद्धा दूरचित्रवाणीचा अवलंब केला असून लाहोर केंद्रावरील कार्यक्रम अमृतसरमधील दूरचित्रवाणीवर येऊ शकतात. या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

श्रीमती अमिता मलिक ह्यांनी तर असा सवाल केला की पाकिस्तान दूरचित्रवाणी आणू शकतो मग भारताला ती का आणता येऊ नये ? पाकिस्तानपेक्षा का आपण गरीब आहोत ? खाजगी आणि सरकारी क्षेत्रांच्या सहकार्यानं हे काम होण्यासारखं आहे. त्याचप्रमाणं एकाच खात्याच्या माथी हा खर्च न मारता शेती, सहकार, आरोग्य, व्यापार, उद्योग, शिक्षण, इत्यादी जी जी खाती दूरचित्रवाणीचा उपयोग करू शकतील त्यांच्या बजेटमधूनदेखील यासाठी खर्च केला जावा. अशाप्रकारे प्रयत्न झाला तर पैशाचा प्रश्न जितका कठीण वाटतो तितका तो वाटणार नाही.

सारांश, दूरचित्रवाणी ही आज विकसनशील देशाची तर अत्यावश्यक गरज आहे. भारतात तिची आवश्यकता आहे. फक्त प्रश्न आहे तो अग्रक्रमांकांचा ! मध्यवर्ती सरकार आणि नियोजन मंडळाने तो सोडवायचा आहे. आमच्याकडे तंत्रज्ञ आहेत, शास्त्रज्ञ आहेत, सुज्ञ कलावंतवर्गही आहे. खाजगी उद्योगपतीही यंत्रसामग्री व सेट्स् स्वस्तात करायला तयार आहेत. पैशाचा प्रश्नही वाटतो तितका भयंकर नाही. जग झपाटयानं पुढं जात आहे. या शर्यतीत भारताला मागे राहून चालणार नाही. आम्हाला दूरचित्रवाणी पाहिजे. ○

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ व्यवस्थितपणाचा घातक परिणाम

लहानपणी आमच्या क्रमिक पुस्तकात व्यवस्थितपणाचे फायदे या विषयावर एक धडा होता. तो वाचल्यापासून व्यवस्थितपणाची मी जी धास्ती घेतली ती आजतागायत कायम आहे. ऑफिस सुरू व्हायला जेमतेम दहा मिनिटे बाकी असताना मी घाईघाईने घरून निघायच्या तयारीला लागतो तेव्हा माझे पेन छोटयाच्या खेळण्याच्या टोपलीत, माझा रुमाल हिच्या पर्समध्ये, माझे बूट सोफासेटच्या खाली आणि एका बुटाची लेस छोटयाच्या तोंडात असते हे मला नक्की माहीत असल्याने या सर्व वस्तू मी चटकन गोळा करू शकतो. तेच माझे पेन कोटाच्या वरच्या खिशात व्यवस्थितपणे अडकवले अन् रुमाल खालच्या खिशात नीट घडी करून ठेवला तर तो कोटच कपाटात हँगरवरच्या साडयांच्या ढिगात सापडता सापडता माझे नाकी नऊ येतील याची मला खात्री आहे. कधी कधी माझ्या गबाळग्रंथी कारभाराला कंटाळून ही " आईकडे " निघून जायची धमकी देते– पण ती धमकी प्रत्यक्ष अमलात आलेली पाहण्याचे भाग्य मला अजून लाभलेले नाही.

सांगायचा मुद्दा काय, परवा इंग्लंडमध्ये म्हणे एका नवऱ्याने बायकोच्या पराकोटीच्या व्यवस्थितपणाला कंटाळून तिच्याशी घटस्फोट घेतला. आता पाश्चिमात्य नवरा हे आधीच गरीब बिचारे मुके जनावर. त्यातून या नवऱ्याला बायकोची सक्त ताकीद होती– टेलिव्हीजन पाहताना खुर्चीवर बसायचे नाही– खुर्चीवरच्या उशा विसकटतात...... अंघोळ करताना साबू खाली सांडायचा नाही...... स्वतःचा सूटदेखील कपाटातून स्वतः काढायचा नाही– कपाटातली व्यवस्था बिघडते......
आता बोला ! गबाळेपणा हा नवऱ्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे, तेव्हा या मौतिक अधिकाराचे हे झोटिंगशाही आक्रमण नवऱ्यासारखा पददलित प्राणी तरी किती सहन करणार ? हे असले प्रकार वाढले तर मला वाटते लवकरच एक जागतिक नवरा–क्रूरता–निवारक चळवळ सुरू होईल. या चळवळीचा आधारस्तंभ म्हणून जी तत्त्वे सूत्ररूपाने स्वीकारली जातील त्यांची कल्पना करणे एक समदुःखी या नात्याने मला जड नाही–

१. प्रत्येक वस्तू जागच्या जागी असली पाहिजे हा बायकांचा असमंजस हट्ट म्हणजे नवऱ्यांच्या मूलभूत स्वातंत्र्यावर छुपे आक्रमण आहे. माणसाला फ्रीडम ऑफ्

मूव्हमेंट हवी तर त्याच्या वस्तूंना का नको ? तस्मात् बुटाची लेस बुटात न सापडता पुस्तकात खूण म्हणून ठेवलेली सापडली तर त्या वस्तूचा हा उपयोग अधिक महत्त्वाचा व म्हणून स्वागतार्ह समजला गेला पाहिजे.

२. आठवड्यातून कमीत कमी एक रुमाल हरवणे जातीच्या नवऱ्याला शोभूनच दिसते. रुमाल ही वस्तू तोंड पुसण्यासाठी नसून हरविण्यासाठी असते हे टिचभर चिंधी हातात शोभेसाठी मिरविणाऱ्या बायकांना कधी कळणार ?

३. नवऱ्याच्या गबाळेपणाला साधपणा हे सोज्वळ नाव असताना कोठल्याही आर्य–स्त्रीने आपल्या नवऱ्याचा उल्लेख मैत्रिणीजवळ करताना " आमचं हे ध्यान " असा करणे सर्वथैव निषिद्ध आहे.

## ☐ परमेश्वराची कॉमिक भक्ती

युरोपातल्या एका आधुनिक शहरात एक पाद्री आपले प्रवचन ऐकण्यासाठी चर्चमध्ये येणाऱ्या लोकांची मुले प्रवचनाच्या वेळी शांत बसावीत म्हणून त्यांना कॉमिक्स वाचायला देणार आहे. शाब्बास ! डोनाल्ड डक आणि मिकी माऊस ही प्रसिद्ध कॉमिक दुक्कल पुढे मागे परमेश्वरी कार्याला हातभार लावेल याची प्रत्यक्ष वॉल्ट डिस्नेलाही कल्पना आली नसेल. मी लहानपणी आईच्या बरोबर समोरच्या देवळात कीर्तनाला जात असे तेव्हा " कार्ट्या, गप्प बसायला काय घेशील ?" या तिच्या त्रासिक प्रश्नाचे उत्तर मी नेहमी " खडी साखरेचा खडा " असे देत असे. पुढे अधिक अक्कल आल्यावर मी माझी किंमत वाढवून खडी साखरेच्या ऐवजी चिक्कीची खंडणी वसूल करीत असे. जाऊ द्या, 'ते हि नो दिवसा गताः ।' कालांतराने चिक्कीची टॉफी झाली अन साहित्यिक क्षेत्रातही क्रांती झाली. म्हणजे दुसऱ्याच दिवशी बापाच्या (वडिलांच्या नव्हे) आज्ञेप्रमाणे उठून शिलंगणाला जाणाऱ्या मोरूची जागा आता डोनाल्ड डक, मिकी माऊस, फँटम, सुपरमॅन आणि कंपनीने घेतली आहे. अन् तेही बरोबरच आहे. कारण आकाशातल्या बापाच्या घरी डिस्नेलँड सारखीच गंमत जंमत असेल तर परमेश्वराची कॉमिक भक्ती करण्याखेरीज उपाय नाही. पण एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे फँटम किंवा सुपरमॅन यांच्याबरोबर गुद्दागुद्दी झाल्यास परमेश्वराचा कितपत टिकाव लागेल ? फँटमचा देमार ठोसादेखील परमेश्वराला उताणा पाडू शकणार नाही अशी प्रस्तुत पाद्री–महोदयांनी आपल्या बाल–भगतगणांची खात्री पटवून दिली की ही बाळ–गोपाळ मंडळी नक्कीच फँटमला सोडून परमेश्वराच्या भजनी लागतील.

## ☐ इम्पोर्टेड आम्लेट

आतापर्यंत हिंदुस्थानाला कोठकोठल्या वस्तू निरनिराळ्या देशांकडून सप्रेम भेट मिळाल्या आहेत याची यादी केली तर गव्हा-तांदळापासून शेळ्या–मेंढ्यांपर्यंत अनेक

गोष्टींचा तिच्यात समावेश करावा लागेल. या यादीत आता एक आनोखी भर पडणार आहे– ऑस्ट्रेलियातले शेतकरी हिंदुस्थानला ३६ कोटी अंडी बक्षीस देणार आहेत. घ्या ! हिंदुस्थानातल्या प्रत्येक माणसाच्या हातात अंडे आहे असे दिसल्यावर कोठला राजकीय नेता भाषण करायला धजेल ? हिंदुस्थानात मतामतांचा गलबला फार माजला आहे, तो थांबला पाहिजे अशी अनेक विचारवंत हाकाटी करीत असतात, पण प्रत्येक नेत्याच्या व श्रोत्याच्या हातात अंडे तयार असणे हाच या गलबल्यावर एकमेव रामबाण उपाय आहे असे आपले तरी प्रांजळ मत आहे. मात्र मला अशी दाट शंका येते की, ही अंडी भारतात राजकीय शांती प्रस्थापित करण्यासाठी मिळणार नसून दुसऱ्या एका दुय्यम उपयोगासाठी– म्हणजे खाण्यासाठी–मिळणार आहेत. पण तसं असेल तर अंड्यांपेक्षा आम्लेटच का पाठवीत नाहीत ? ब्रह्मांडातून सगळीकडून भीक मागणाऱ्या– चुकलो, मदत मिळविणाऱ्या हिंदुस्थानाला अंड्यांची मदत आम्लेटच्या स्वरूपात अधिक स्वीकार्य वाटेल.

खरे म्हणजे मदत करणाऱ्या या सगळ्याच देशांवर माझा असा आक्षेप आहे की ही मंडळी मदत करताना थोडेदेखील डोके वापरीत नाहीत. आता हेच बघा, अनेक देश आपल्याला तांदूळ पाठवितात– पण एकाने तरी राइस-प्लेट पाठविली आहे का ? अमेरिकेने आतापर्यंत जहाजे भर भरून गहू पाठविला आहे– पण चतकोर चपाती पाठविण्याचे तिला कधी सुचले नाही. लाखो रुपयांची दुधाची भुकटी आम्हांला फुकट मिळते– पण " एक पेशल " किंवा " एक सिंगल " चहा कोणी दिला का ? आणि शेळ्या–मेंढ्या व बैलांच्या भेटी तर अगदीच निरुपयोगी आहेत. आमच्या परदेश–मंत्रालयात भरपूर शेळ्या आहेत व आमच्या राजकारणात बैलांना तर अग्रपूजेचा मान आहे हे या मंडळींना केव्हा समजणार ? म्हणून अंड्यांची भेट देऊ करणाऱ्या ऑस्ट्रेलियन मंडळींना माझी सूचना आहे– अंडी देणार असाल तर आम्लेटच द्या– अन् हे बघा, फार खारट झालेलं आम्हाला चालणार नाही बरं का !

## राष्ट्रीयतेची ॲलर्जी

ऑस्ट्रेलियातील काही डॉक्टरांनी असा शोध लावला आहे की हिंदुस्थानी माणसांना दुधाची ॲलर्जी असते, त्यामुळे दूध किंवा दुधापासून होणाऱ्या पदार्थांची जी मदत हिंदुस्थानला परदेशाहून मिळत असते ती कमी होण्याचा संभव आहे. हां, खबरदार ! हा निव्वळ प्रोपागांडा–नव्हे, अँटी–प्रोपागांडा आहे. भिकाऱ्याला ओकारी कोणी ऐकली आहे काय ? अहो, हिंदुस्थानला इतक्या निरनिराळ्या खाद्यपदार्थांची परदेशी मदत होत आहे की हिंदुस्थानी माणसाला त्यांची ॲलर्जी झाली तर त्याला अक्षरशः उपाशी-पोटी मरावे लागेल. म्हणून म्हणतो मंडळी, आयत्या मिळणाऱ्या कुठल्याही गोष्टीची आम्हाला ॲलर्जी नाही. आम्हांला यदाकदाचित दुधाची ॲलर्जी असलीच तर आम्ही तुमच्या दुधाचा चहा करून पिऊ, गव्हाची ॲलर्जी असली तर तुमच्या

गव्हाची खीर करून खाऊ, तांदळाची ॲलर्जी असली तर बिर्याणी करून चापू, इतकेच काय, पण तुम्ही कुक्कुट पालनासाठी पाठविलेल्या कोंबड्यांच्या अंड्यांची ॲलर्जी असली तर न डगमगता मुर्गमसालम् हाणू. तेव्हा असले काही तरी बाष्कळ कारण पुढे करून आमच्या पोटावर पाय आणू नका.

## □ ( जिभेला ) चटका लावणारी आधुनिकता

मॉडर्न आर्ट साध्या सरळ माणसासांठी नसते याची मला पूर्वीच खात्री पटली होती. पण आता असे दिसते की, ती शहाण्या-सुरत्या माणसासाठीही नाही. परवा कुठल्याशा पाश्चिमात्य देशात वेड्यांनी काढलेल्या चित्रांचे प्रदर्शन भरले होते, ते पाहून जाणकार टीकाकारांनी म्हणे असा अभिप्राय व्यक्त केला की त्या चित्रांचे मॉडर्न आर्टशी फार साम्य आहे. पाहिलेत ? वेड्यांची चित्रे नवचित्रकारांच्या चित्रासारखी असतात हे माझ्यासारख्या अनभिज्ञ माणसाला माहीत नसले तरी नव-चित्रकारांची चित्रे वेड्यांच्या चित्रासारखी वाटतात असे आपले पहिल्यापासूनच मत होते. खरे म्हणजे हल्ली कुठल्याही क्षेत्रात माणूस शहाण्यासारखा वागला की तो लगेच जुनाट ठरतो. उदाहरणार्थ, माझी पँट सहज घालता येण्यासारखी रुंद आहे—अर्थात आमच्या चिरंजीवांच्या मते हा लज्जास्पद जुनाटपणा आहे. ते मॉडर्न आहेत—म्हणजे त्यांची पँट पायात शिरताना त्यांना बरीच झटापट करावी लागते. चहा बशीत ओतून फुंकून जरासा निवल्यावर पिणे हा शहाणपणाचा—म्हणजेच जुनाटपणाचा मार्ग, मॉडर्न पद्धत म्हणजे जिभेला चटके बसत असतानाही कप तोंडाला लावणे अन् मूग गिळून चहा गिळणे. थोडक्यात पूर्वीच्या गोष्टी मनाला चटका लावीत—हल्लीच्या जिभेला चटका लावतात. ○


| | |
|---|---|
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस |
| सहा साहसे | दा. सी. देसाई |

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.





# नजराणा

ब. मो. पुरंदरे

श्रीमंत धाकटे बाजीराव पेशवे ब्रह्मावर्ताला उरलेलं आयुष्य वेचीत होते. लढायांची राजकारणं आणि दिग्विजयांची स्वप्नं कुणालाच पडत नव्हती. इंग्रज टोपीकरांचा अंमल सर्वत्र बसला होता. आता श्रीमंत गढले होते श्राद्धपक्षात, नवी नवी लग्नं करण्यात आणि अनुष्ठानात. ब्रह्मावर्ताचा पेशव्यांचा तळ म्हणजे माशा मारीत जिणं जगणाऱ्यांची गर्दी.

पण त्याही गर्दीत दोन तीन तारे जरा वेगळयाच तेजाने चमकत होते. तात्या टोपे, श्रीमंत नानासाहेब पेशवे आणि श्रीमंत रावसाहेब पेशवे. तिघेही तरुण होते. हत्यारंपात्यारं फिरवीत होते. घोडे दौडवीत होते. बंदुकीचे नेम धरीत होते. अन् त्यातच एक चिमखडी चांदणी चमकत होती. तिचं नाव मनू.

मनू होती मोरोपंत तांब्यांची लेक. मोरोपंत स्वतः कोणी सरदार जहागीरदार नव्हते. ते होते साधे भिक्षुक. पण त्यांची मनू मात्र लहानपणीच चमकत होती, भासत होती रुद्रातल्या ऋषीसारखी.



नाना, राव, मला हत्तीवर घ्या ! हत्ती थांबवा.

मनू लहान होती. अवघी सात वर्षांची. खेळाबागडायला ब्रह्मावर्ताचं अंगण तिला अपुरं पडत होतं. तात्या टोपे, श्रीमंत नानासाहेब, श्रीमंत रावसाहेब, श्रीमंत बाळासाहेब इत्यादी तरुणांच्या संगतीतच ही हिरकणी खेळत होती. तलवार फिरवीत होती. बर्कंदाजी करीत होती. सर्वांची लाडकी होती.

मनूला आई नव्हती. ती पोरकी होती. पण मोरोपंतांनी तिला तीही मायेची उणीव भासू दिली नाही. स्वतः मोरोपंत आईची आणि वडिलांची भूमिका पार पाडीत होते.

मनू एका गरीब भिक्षुकाची पोर होती. पण पेशव्यांच्या तरुण मुलांनी तिला तसं कधी मानलं नाही. अगदी बरोबरीच्या नात्याने आणि लाडाने ते तिला वागवीत असत. असं नवख्याला वाटावं की, मनूसुद्धा पेशव्यांचीच पोर. श्रीमंत नानासाहेबांचा स्वभाव तर दिलदारच होता. ते मोठे खेळकर होते. इतरही श्रीमंत तसेच होते. पण त्यातल्या त्यात श्रीमंत रावसाहेब पेशव्यांचा स्वभाव जरा डावा होता. कधी कधी

उगीचच तापायचे. कधी कधी क्षुल्लक गोष्टीतच हट्टाला पेटायचे. एरवी माणूस लाख मोलाचा.

एकदा असंच झालं. एकदा श्रीमंत नानासाहेब पेशवे आणि श्रीमंत रावसाहेब पेशवे हत्तीवर बसून वाड्यातून बाहेर पडले. माहुत हत्ती चालवीत होता. स्वतः दोघेही पेशवे पेशवाई थाटात हत्तीवर अंबारीत बसले होते. दोघांच्याही अंगावर दागदागिने व पगडीवर कलगीतुरे होते. हत्ती सजवलेला होता. डौलात त्याची पावलं पडत होती. हत्ती बिनझोल चालला होता. वाटेवर लोक झुकून मुजरे करीत होते. या वेळी तांब्यांची मनू कुठे तरी अशीच खेळत होती. खेळता खेळता दूरवर तालात वाजणाऱ्या गजघंटांचा नाद तिला ऐकू आला. तिनं मान वळवून पाहिलं. घण् घण् घंटा वाजत होत्या. त्या तालावर हत्तीची पावलं पडत होती. अंबारी उन्हात चमकत होती. अंबारीत बसलेल्या स्वाऱ्या तिने पाहिल्या. अंबारीत होते श्रीमंत नाना. श्रीमंत राव. तिला हुक्की आली की, आपणही अंबारीत बसावं !

मनू हसली. उठली. परकराचा ओचा सोडून अन् कपाळावरच्या केसांच्या बटा सावरीत मनू हत्तीच्या दिशेने पळत सुटली.

हत्तीच्या पावलांखाली जमीन दबत होती. घंटाघुंगरं वाजत होती. हत्ती मधूनच सोंड उंचावीत होता. मनू धावत धावत समोरून येत होती. धावता धावता हात उंचावून ती हसत हसत ओरडत होती,

"नाना, राव, मला हत्तीवर घ्या ! हत्ती थांबवा ! मला हत्ती-वर घ्या ! "

नानासाहेबांनी व रावसाहेबांनी तिला पाहिलं. नानासाहेब हसले. रावसाहेबांच्या कपाळावर मात्र अठी पडली. मनू ओरडत होती,

"हत्ती थांबवा ! मला घ्या ! नाना, राव–"

माहुताने वळून अंबारीतील मालकांकडे आज्ञेकरिता पाहिलं. त्यांची खात्रीच होती की, मालक हत्ती थांबवायला सांगणार. मनू वर येणार. तेवढ्यात नानासाहेब म्हणालेच,

"थांबव हत्ती ! आपली मनू. हत्ती बसव, तिला वर घे ! "

पण तेवढ्यात रावसाहेब मोठ्याने ओरडले,

"काही नको थांबायला ! चला पुढं ! "

" रावसाहेब, अहो, आपली मनू– "

" राव, नाना, हत्ती थांबवा ना ! "

चालत्या हत्तीच्या बरोबर पळत पळत मनू अंबारीकडे पाहत म्हणत होती.

-" नाही नाही, हत्ती थांबणार नाही ! "

रावसाहेब गरजले अन् अंबारीतून झुकून बाहेर मनूकडे पाहत म्हणाले,

" भटाभिक्षुकाची पोर ! तुला कशाला हवी ग हत्तीची हौस ? घरी जा दर्भ निवडायला ! "

हे ऐकलं मात्र, अन् मनू चित्रासारखी थबकली. तिचे डोळे विस्फारले गेले. हत्ती झपाझप चालतच राहिला. मनू मोठ्या तिरिमिरीने ओरडून म्हणाली,

" जा जा ! नको मला हत्ती ! असले पंचवीस हत्ती मी सांभाळीन माझ्या घरी ! "

रावसाहेबांनी ते ऐकलं. पण ते थट्टेने हसले. मनू तोंड फिरवून घरी पळत सुटली होती.

अन् काय योगायोग बघा. पुढच्याच वर्षी झाशीच्या राजे गंगाधर-रावांकडून माणसं मनूला पाहू आली. त्यांनी मुलगी पाहिली. लग्न ठरलं, लग्न झालं. तांब्यांची – एका भटभिक्षुकाची पोर-झाशीची राणी झाली. मनू लक्ष्मी झाली. हत्तीवरून मिरवीत मिरवीत ही लक्ष्मी झाशीच्या राजवाड्यात प्रवेशली.

लक्ष्मीपूजन झालं. बाहेर हत्तींची रांग अंगणात झुलत होती. झाशीची गजान्त लक्ष्मी वैभवात लखाखत होती. चौघडा वाजत होता.

अन् राणीच्या नात्याने पहिली आज्ञा मनूने कारभाऱ्याला सोडली,

" एक देखणा हत्ती ब्रह्मावर्तास श्रीमंत रावसाहेब पेशव्यांना आमचा नजराणा म्हणून पाठवा ! "

हत्ती ब्रह्मावर्तास रवाना झाला. हत्ती नजर आलेला पाहून श्रीमंत रावसाहेब विस्मित झाले. म्हणाले,

" पोरीला विस्मरण नव्हतं झालं हं !

O

१५ जून १९६८

## पॅरीस आणि पुणे

..................................पान ९ वरून

अशा आवळल्या गेल्या असल्या आणि गॉल सरकारला नाक मुठीत धरून वाटाघाटींच्या मेजावर यावे लागले असले तरी विद्यार्थी आपली आघाडी सोडायला काही तयार नव्हते.

—लिऑन्स येथे एका पोलीस कमिशनरच्या अंगावर दगडाने भरलेला ट्रक घालून विद्यार्थ्यांनी त्याला ठार केला.

—भांडवलशाहीचे प्रतीक असलेल्या पॅरीसच्या शेअर बाजारावर हल्ला चढवून विद्यार्थ्यांनी तेथे जाळपोळ केली.

—फ्रेंच सेनेटरवर बॉम्ब फेकले.

—कामगारवर्गाने साथ द्यावी म्हणून विद्यार्थ्यांच्या झुंडी काही कारखान्यांपर्यंत चालत गेल्या.

कामगारांनी साथ दिली, पण फार सावधपणे. ' आमच्यात लुडबुड करू नका ' अशा काही ठिकाणी कामगारांकडून विद्यार्थ्यांना कानपिचक्याही मिळाल्या. ' अती जहाल विद्यार्थी चळवळींपासून दूर राहा ' असे कामगारनेत्यांकडून आदेशही सुटले. ' स्टॅलीनचे संधीसाधू बगलबच्चे ' हा घरचा आहेर विद्यार्थ्यांनीही इमानेइतबारे कामगारनेत्यांपर्यंत पोचविला.

अहोरात्र मंत्रिमंडळाच्या बैठका चालू होत्या, कामगार नेते आणि पाँपेदू मंत्रिमंडळ यांच्या वाटाघाटी संपतच नव्हत्या. पंचवीस मेला अखेरीस उभयपक्षी मान्य झालेली तडजोड कामगारांच्या गळी उतविण्यासाठी सी. जी. टी. या प्रचंड कम्युनिस्ट संघटनेचे नेते जॉर्ज सेगू बिलिनकोर्ट येथील रेनॉल्ट कारखान्याकडे धावले. पण कामगार नमायला तयार नव्हते. संध्याकाळच्या पन्नास हजारांच्या विद्यार्थी–कामगारांच्या संयुक्त सभेत ' द गॉल चालते व्हा' बरोबर ' सेगू चालते व्हा, विश्वासघात करू नका ' अशा घोषणा दुमदुमल्या तेव्हा सगळ्यांचीच डोकी गरगरायला लागली. दहा लाख सभासदसंख्या असलेल्या कामगार संघटनेच्या नेत्याची यावेळची ही अवस्था पाहून एक समाजवादी विचाराचा स्तंभ लेखक आपल्या समाजवादी विचारसरणीच्या साप्ताहिकात लिहितो, –' It was a most pathetic sight, most pathetic– ते दृश्य फार केविलवाणे होते. फार केविलवाणे.' विद्यार्थ्यांना काय हवे ते कामगारांना कळत नव्हते, कामगारनेते कामगारांना समजू शकत नव्हते, द गॉलची राजवट तर साऱ्या फ्रेंच जनतेपासून दूर दूर गेली होती. इकडे कम्युनिस्ट कामगारसंघटनेचा चिटणीस राजीनामा देत होता. तिकडे द गॉलच्या मंत्रिमंडळातील काही मंत्री बाहेर पडत होते. या गदारोळात सगळेच उलथेपालथे होत होते, जवळचे समजले जाणारे दुरावत होते, दूर वाटणारे अचानक जवळीक निर्माण करीत होते.

अखेरचा रामबाण सत्याला स्मरून सुटला. 'पक्षपाती वार्ता आम्ही प्रसारित करणार नाही,' असे सरकारी मालकीच्या रेडिओ-टेलिव्हिजन कर्मचाऱ्यांनी जाहीर केल्यामुळे द गॉल सरकारची प्रचार आघाडीच कोसळली. चुकीचा मथळा देऊ देण्यास कामगार कर्मचाऱ्यांनी हरकत घेतली म्हणून पॅरीसचे सर्वाधिक खपाचे 'ला पॅरिशिअन लिबरे' हे प्रभातदैनिक प्रसिद्ध होऊ शकले नाही, हा नैतिकतेचा एक विजय होता. 'आमच्या सदसद्विवेक बुद्धीला क्लेष होतील असे कृत्य करण्याची पाळी आमच्यावर येऊ देऊ नका,' असे पोलीस संघटनांनी शासनाला कळविल्यावर तर ही केवळ विद्यार्थ्यांची, कामगारांची, एखाद्या पक्षाची चळवळ नसून समग्र फ्रेंच जनतेचा हा मानसिक उद्रेक आहे, कुठली तरी खोल मानवी व्यथा येथे चित्कारून उठली आहे, बऱ्याच काळ कोंडल्या, दडपल्या गेलेल्या भावनांना ही वाट सापडली आहे, एका राजवटीची ही केवळ मृत्युघंटा नसून पश्चिमेने प्रमाण मानलेली मूल्येच येथे उन्मळून पडत आहेत, हे स्पष्ट झाले. फ्रान्सपूर्वी पश्चिम जर्मनीत हे घडले. फ्रान्सपाठोपाठ स्पेनमध्ये हे घडले. स्वित्झर्लंड, डेन्मार्क, इटली, ब्राझील, अमेरिका, जपान, इजिप्त, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया कुठे ही लाट उसळायची राहिली आहे !

या लाटेचा अर्थ काय हे समजून घेण्यासाठी आम्ही सगळे बेडेकरांच्या गच्चीवर दोन तास चर्चा करीत होतो.

विद्यार्थी सांगत होते : 'आम्हांला भांडवलशाही नको, आम्हांला कम्युनिझम हवा,' असा या लाटेचा आवाज आहे.

मी म्हणत होतो : 'डॅनी दि रेड' ज्याला गुरुस्थानी मानतो त्याची शिकवण वेगळी आहे. मार्क्युजचे सांगणे आहे– 'To-day individuals are dominated and manipulated by big institutions of Govt. and business. Man has the obligation to oppose them' – 'आज व्यक्ती हा प्रचंड संघटनांच्या हातचे बाहुले बनली आहे. संघटनांचे व्यक्तिजीवनावरील हे आक्रमण थोपविणे प्रत्येक व्यक्तिमात्राचे कर्तव्य आहे.'

डॅनी आणि त्याचे जगभरचे साथी हे कर्तव्य तर बजावीत नसतील !

–श्री. ग. मा.



[ छायाचित्रे : 'टाईम' साप्ताहिकावरून ]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## जून १५ ते २१ राशि-भविष्य

**मेष :** पराक्रमस्थ मंगळ म्हणजे सर्व काही असे समीकरण मेषराशी व्यक्तींच्या बाबतीत निश्चितपणे मांडले जाते. आता दबलेला आवाज उठेल, कर्तृत्व उफाळून येईल, निर्धार आणि निष्ठा पेटून उठेल. आणि या सर्वांमुळे असे घडेल की, जे कधी कुणाच्या हातून घडले नाही असे अद्वितीय कार्य आपल्या हातून सहजासहजी घडून येईल.

आपल्या साडेसातीला आपण आता विसरू शकता.

पाचवा आणि तिसरा मंगळ असे योग १२–१४ वर्षांनी केव्हातरी येत असतात आणि म्हणूनच ते आपल्या चारित्र्याला प्रचंड उत्थान द्यायला कारण ठरतात. दि. १५,१७,१९ अपेक्षासाफल्याचा काळ.

**वृषभ :** मंगळ तुमच्या राशीतून निघून गेल्यापासून तुमचा दबलेला आवाज उठू लागेल. "म्हणेन ते करून दाखवीन" या त्या तुमच्या स्वभावधर्माला पोषक असा काळ आताच निर्माण होत आहे.

सांपत्तिकदृष्ट्या फार मोठी अपेक्षा या कालापासून करता आली नाहीं तरी आपला भविष्यकाल निश्चित उज्वल असण्याची खात्री या कालापासूनच पटू लागेल.

नव्या कल्पना अमलात येतील. नव्या योजना हाताळल्या जातील. अनेकांचे सहकार्य लाभेल. वरिष्ठ प्रसन्न मनाने वागू लागतील. तुमचा अनिष्ठ काल संपल्यासारखाच आहे.

दि. १७ तें १९ अत्युत्तम लाभ पदरी पडावेत.

**मिथुन :** सूर्य आणि मंगळ – दोन्हीही प्रखर ग्रह तुमच्या राशीतूनच संचारत असल्यामुळे नित्याच्या तंत्रमंत्रात आपणांस बदल घडवून आणल्यावाचून गत्यंतरच नाही वारा पाहून पाठ फिरवण्याची वैचारिक घडण असेल तरच सध्याच्या कालात निभाव लागेल.

सध्याच्या विज्ञाननिष्ठ युगात जग फारच गतिमान बनलय. तुम्हालाही गतीचा कायदा पाळणे भाग पडेल.

या काली आपणावर फार मोठ्या जबाबदाऱ्या पडतील. अनंत कामे निपटून काढण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल. आणि या सर्वांमुळे प्रकृतीवर ताण पडल्याशिवाय राहणार नाही.

दि. १६,१८,२१ या काली अनुकूल घटना घडतील.

**कर्क :** आजवर रवि-मंगळाच्या कृपाछत्राखाली आपण वावरत होता. आता आपण त्यांची सहानुभूती गमावून बसला आहात. दोन्हीही ग्रह एकदम व्ययस्थानी येणे म्हणजे मोठी आपत्तीच.

आता आपणांस अनेक अडी-अडचणींशी झगडावे लागेल, सांपत्तिक उणीव तीव्रतेने जाणवू लागेल. अपेक्षेप्रमाणे काहीच घडेनासे होईल. आणि ही तुमची अवस्था पाहून हितशत्रू याच वेळी उठाव घेतील.

नोकरीधंद्यात आडाखे फसतील. साहस अंगाशी येईल. इष्टमित्र कोणत्याही क्षणी बनवतील.

दि. १८ ते २१ थोडाफार अनुकूल काल याच वेळी प्रत्ययास यावा.

**सिंह :** सूर्य-मंगळ लाभस्थानी आल्यापासून तुमचा साराच नूर पालटून गेला आहे.

मनात आणावे ते सहजासहजी घडावं असा प्रत्यय क्षणोक्षणी यायला लागेल.

नोकरीधंद्यात फार मोठे प्रगतीचे टप्पे गाठू शकाल. या वेळी तुमचा दरारा, दबदबा इतका वाढेल की, तुम्हांला सारेच टरकून वागू लागतील.

औद्योगिक क्षेत्रात प्रचंड उलाढाली या कालापासून घडून यायला लागतील. स्थावर-वाहन या संबंधीच्या आपल्या बऱ्याच दिवसांच्या असफल अपेक्षा सफल व्हायला लागतील.

दि. १९,२०,२१ या काली बऱ्याचशा अपेक्षा सफल होतील.

**कन्या :** रवि-मंगळ दशमस्थानी. एवढा एक योगही तुमच्या यशस्वी जीवनाची ग्वाही द्यायला समर्थ आहे. अजूनही काही दिवस आपण व्यवसाय क्षेत्रात आघाडीवरच राहू शकाल. बाराव्या गुरूला या वेळी तरी डरायचे कारण नाही. या वेळी आगामी महिन्याभरातही आपण कुठेही गेलात तरी आपला सत्कारच होईल. या वेळी कसेही पाऊल टाकले तरी ते पावित्र्यातच पडेल.

कलासाहित्याच्या क्षत्रांत प्रतिष्ठेचे स्थान लाभेल. या आठवड्यापासून तुमचे आखीव वेळापत्रक चुकू शकणार नाही. या संधीचा आपण योग्य तो लाभ उठविलात तर आपल्या साऱ्या अपेक्षा सफल होतील.

दि. १५,१७,२० या काली नवे कार्यक्रम आखले जातील.

**तूळ :** भाग्यातील रवि-मंगळ म्हणजे एक महान पर्वकालच होय. ते ग्रह प्रसन्न मनानं तुम्हाला हवं ते द्यायला उद्युक्त असतात. त्यांच्या प्रसन्नतेचा आपण लाभ उठवण्याचा प्रयत्न केलात तर हवं ते तुमच्या पदरी पडू शकेल.

या वेळी शिक्षणक्षत्रात सर्वोत्तम यश लाभेल. शिक्षणासाठी व व्यवसायधंद्यासाठी स्थानांतर स्थित्यंतरही घडल. तुम्हापैकी कित्येकांना परदेशी जाण्याचीही संधी लाभेल.

या वेळी तुमच्यातील सुप्त कर्तृत्वाला जागा येईल. अनन्यसाधारण अलौकिक असं कार्य हातून घडल आणि त्यामुळे जगाच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतील. आपल्या जीवनातील सर्वोत्तम प्रगतीचा काल हाच.

दि. १९ ते २१ सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

**वृश्चिक** · आपल्या राशीच्या अष्टमस्थानी रवि-मंगळादी चार ग्रह येत आहेत. ते काही तुम्हाला समाधानाची झोप येऊ देतील असे दिसत नाही. कधी अनारोग्याच्या कटकटी तर कधी संपत्तिक अडचणी अशा अनेक प्रसंगांशी आपणास तोंड द्यावे लागेल.

शनीचे राश्यंतर थोडेफार आपणास अनुकूल जाणवेलही पण ती अनुकूलता क्षणकालाचीच ठरेल.

मनात बऱ्या-वाईट विचारांचे वादळ उठू लागेल, प्रगतीच्या मार्गात विरोधक अडथळे निर्माण करू लागतील. वरिष्ठही कित्येक प्रसंगी तुमच्यावर नाराज दिसू लागतील.

दि. १८ ते २० थोडाफार अनुकूल काल.

**धनू :** मंगळ तुमच्या समोरच उभा ठाकला आहे. तुमची प्रगती रोखण्याचाच त्याचा विचार दिसतोय, त्याच्याशी थोडेफार मिळते जुळते घेऊन वागलात तर तुमचा पेचप्रसंग सुटू शकेल.

या काली नोकरीधंद्यांत अनेक कटकटी निर्माण व्हायला लागतील. कौटुंबिक

आमच्याकडे येणाऱ्या कवितांची संख्या भरपूर आहे. त्यामुळे त्या संबंधीचा पत्रव्यवहार ज्या वेगाने हवा तसा होऊ शकत नाही. त्यातून डिसेंबर १९६८ पर्यंतच्या कवितांची निवड पूर्ण झाली असल्याने या पुढील कवितांची दखल घेणे, किंवा त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करणे जवळ जवळ अशक्यच आहे. तसेच 'माणूस'कडे पाठवलेल्या लेखासोबत पुरेसे टपाल हशील जोडावे.

*—संपादक*

आजारीपणामुळे मन त्रस्त होईल. पैसा आणि प्रतिष्ठा यांवरही थोडाफार अनिष्ट परिणाम होईल.

या वेळी घाईगर्दीने कोणताही निर्णय घेऊ नका. व्यापारधंद्यांत तर चुकूनही साहस करू नका. अशा अनिष्ट काली काही न करण्यासारखा शहाणपणा नाही. दूरचा प्रवास टाळा.

दि. १५,१६,१७ थोडफार यश पदरी पडावे.

**मकर :** ईशकृपेने आणि अनेकांच्या सहकार्याने या आठवड्यात सामाजिक व राजकीय जबाबदाऱ्या आपण यशस्वीपणे पार पाडून दाखवाल. मंगळ-रविसह अनेक ग्रह षष्ठात आलेले असल्यामुळे, अपयश, अपेक्षाभंग हे शब्द आता आपल्या वाऱ्यालाही उभे राहू शकणार नाहीत. आठव्या गुरूमुळे एवढेच घडेल की, कोणत्याही गोष्टीत घवघवीत यश मिळविण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

या वेळी प्रवास काहीसा जपूनच करा. कोणत्याही क्षणी वाहन रुसून बसेल, नोकरचाकर रुटून बसतील. खर्चाचे मान खूपच वाढेल.

दि. १७ ते १९ अपेक्षा सफल होतील.

**कुंभ :** कित्येक महिन्यांनंतर इतकी अनुकूल ग्रहरचना तुमच्या वाटचास आलेली आहे. सांसारिक व्यावसायिक साऱ्या-व्यथा-विवंचना आता मिटून जातील. शैक्षणिक क्षेत्रात, संशोधन विभागात, कलेच्या प्रांतातही तुम्ही आपला आवाज उठवू शकाल.

नोकरीधंद्यातील साऱ्या स्थगित प्रकरणांना गती मिळू लागेल. वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभेल. प्रज्ञा विकसेल, प्रतिष्ठा वाढीस लागेल, धनोत्पादनाचे नवे नवे मार्ग दृष्टि-क्षेपात यायला लागतील.

राहत्या जागेचा प्रश्न सोडविण्यात यशस्वी व्हाल आणि नव्या योजना अमलात आणण्यात निश्चित विजयी व्हाल.

मंगल कार्याचेही या वेळीच ठरू शकेल.

दि. १८ ते २१ या कालापासून तुमची प्रगती वेग घेऊ लागेल.

**मीन :** सुखस्थानी अनेक ग्रह आल्यापासून तुमचे स्वास्थ्य उडाल्यासारखे झाले आहे.

या वेळी कोणत्याही ग्रहाची आपणास सक्रिय सहानुभूती लाभेल असं दिसत नाही. तुमच्या प्रयत्नांवर आणि निर्धारावरच तुम्हांला अवलंबून राहावे लागणार आहे.

कौटुंबिक वातावरण अप्रसन्न बनू लागेल. सांपत्तिक ताण तर कमालीचा जाणवायला लागल. वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केलात तरच अनवस्था प्रसंग टळेल. या काली प्रकृतीची विशेष काळजी घ्या. स्वतःची आणि कुटुंबियांचीही.

दि. १९ ते २१ काहीसे अनुकूल दिवस.

○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

# १९५१ नंतर . . .

ऑक्टोबर १९४९ मध्ये पंतप्रधान पंडित नेहरू अमेरिकेत गेले होते. त्यांना वीस लाख टन गहू आणि भांडवल हवे होते, पण प्रतिष्ठा आणि अहंकार यापायी त्यांनी त्याची भीक मागितली नाही. १९५० च्या डिसेंबरपर्यंत हा अहंकार कसाबसा टिकला. त्यानंतर तेथील भारतीय वकीलाने २० लाख टन गहू आणि भांडवल मागितले. अमेरिकनांनी स्पष्टपणे सांगितले की भारताला गहू वगैरे पाहिजे ते आम्ही देऊ, पण अमेरिकेला आवश्यक वाटतील त्या वस्तू त्याबदली आम्ही भारताकडून घेऊ.

१९५० मधील ही गोष्ट. आणि हिंदुस्थानने अमेरिकेला मँगनीज आणि मोनासाईट आयस्क–ज्याला ओअर म्हणतात-आणि अणुनिर्मितीसाठी जे अत्यावश्यक असते ते द्यावयास सुरुवात केली. १९५१ नंतर हिंदुस्थान पूर्णपणे अमेरिकेच्या हातात गेला.

—डॉ. राममनोहर लोहिया

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.